


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक १३० * नांदेड * शनिवार, दि. १७ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# अवकाळी पावसाने नांदेड शहर जलमय; तुंबलेल्या नाल्यांमुळे अनेक घरांत पाणी शिरले!




## व्यंकटेशनगर, विष्णुनगर, वसंतनगरासह अनेक भागात नाल्या तुंबलेल्याच!





### मनपा स्वच्छता विभागाचे वाभाडे

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व जिल्ह्यात शुक्रवारी रात्री अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे नांदेड शहर जलमय झाले, यातच शहराच्या विविध भागात तुंबलेल्या नाल्यांमुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरले. यामुळे महानगरपालिका स्वच्छता विभागाचे वाभाडे निघाले आहेत.

अचानक आलेल्या पावसाने खरेदीसाठी बाजारपेठेत आलेल्या नागरिकांची धांदल उडाली. श्रीनगर, महावीर चौक या भागात रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक मार्गातही वाहनधारकांना कसरत करावी लागली. शहराच्या व्यंकटेशनगर, वसंतनगर, खडकपुरा, विष्णूनगर, मगनपुरा, देगलूर नाका, इस्लामपुरा आदी सखल भागात पाणी साचून ते चक्क नागरिकांच्या घरामध्ये शिरले. शहराच्या बोरबन फॅक्टरी भागात एका चारचाकी वाहनावर झाड उन्मळून पडले. पाऊस सुरू होताच महावितरणचा वीज पुरवठा खंडित झाल्याने शहर बराच वेळ अंधारात चाचपडत होते. महानगरपालिकेच्या वतीने नाल्याची साफसफाई केली नसल्याने नाल्यातील घाण पाणी रस्त्यावर साचले, तर सखल भागात लोकांच्या घरांमध्येही पाणी शिरले. या पावसाने शहरातील रस्ते जलमय झाले होते.

यासह नायगाव तालुक्यात वीज पडून एक जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली. तसेच अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. विजेच्या तारा तुटून महावितरणचे नुकसान झाले.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार शुक्रवार, दि. १६ मे रोजी रात्री सात ते आठच्या सुमारास शहर व जिल्ह्यात जोरदार पाऊस पडला. वादळी वारे, ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसाचा फटका नायगाव, मुखेड, कंधार, लोहा, अर्धापूर, मुदखेड, बारड परिसरासह नांदेड शहरालाही बसला. नायगाव तालुक्यात एका ३० वर्षीय व्यक्तीच्या अंगावर वीज पडून त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. तसेच अर्धापूर तालुक्यातील बारड परिसरात केळी, पपई यासह बागायती पिकांचे मोठे नुकसान झाले. शहरातील नवीन मोंढा भागात व्यापाऱ्यांनी उघड्यावर ठेवलेले हळद व अन्य धान्य झाकण्यासाठी एकच घाई करण्यात आली. मागील काही दिवसांपासून तापमान प्रचंड वाढल्याने या पावसामुळे मात्र नांदेडकरांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला.

# नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरसाठी दोन 'सीट्रिपलआयटी'ना मंजूरी

**मुंबई (प्रतिनिधी)–** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांच्याच पुढाकारामुळे बीड जिल्ह्यानंतर आता नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अॅन्ड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रिपलआयटी' मंजूर करण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पाठविलेल्या पत्राला कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरसाठी दोन प्रशिक्षण केंद्रे मंजूर केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. अजित पवार यांनी घोषणा केल्यानंतर अवघ्या दीड महिन्यात मराठवाड्यातील बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर या तीन जिल्ह्यांसाठी तीन 'सीट्रिपलआयटी' मंजूर झाले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रयत्न आणि टाटा टेक्नॉलॉजीच्या सहकार्याने महिन्यापूर्वी बीडसाठी 'सीट्रिपलआयटी' मंजूर झाले आहे. त्यानंतर आता नांदेड व छत्रपती संभाजीनगरसाठी दोन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने, मराठवाड्यातील युवकांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण, उद्योगक्षेत्राला कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यात नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासह अनेक उद्दीष्टांची यानिमित्ताने पूर्ती होणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याचा विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांचे सातत्याने मराठवाडा दौरे सुरु आहेत. दि. २३ एप्रिल २०२५ रोजीच्या मराठवाडा दौऱ्यात नांदेड येथे बोलताना त्यांनी बीड, नांदेड व छत्रपती संभाजीनगर येथे 'सीट्रीपलआयटी' उभारण्याची घोषणा केली होती. दौऱ्यावरुन मुंबईत परतल्यानंतर दि. २५ मार्च २०२५ रोजी तात्काळ टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून या तीन जिल्ह्यांसाठी 'सीट्रिपलआयटी' उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. कंपनीने दीड महिन्यात तिन्ही जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर केल्याची पत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठवून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या 'सीट्रीपलआयटी' मुळे मराठवाड्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, 'एआय' वापरासह तांत्रिक कौशल्यविकासाची संधी मिळेल. युवकांना उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात 'सीट्रिपलआयटी' महत्वाची भूमिका बजावणार आहेत.

'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविलेल्या पत्रात, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी प्रत्येकी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीट्रिपलआयटी' स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे कळविले आहे. यापैकी १६२ कोटी ६२ लाख रुपये टाटा टेक्नॉलॉजी तर, उर्वरीत रक्कम राज्य शासन आणि संबंधित जिल्हा प्रशासन देणार आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून मराठवाड्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीट्रिपलआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी प्रत्येकी ७ हजार प्रमाणे मराठवाड्यातील २१ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.

# शासकीय दस्तऐवजात खाडाखोड केल्याप्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी निलंबित

**नायगाव (प्रतिनिधी)–** शासकीय दस्तऐवजात नियमबाह्य खाडाखोड केल्याच्या कारणावरून नायगाव तालुक्यातील पिंपळगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी आर.जी.मुदखेडे यांना नांदेड जिल्हा परिषदेच्या सीईओ मेघना कावली यांनी निलंबित केले आहे.



ग्रामपंचायत अधिकारी आर. जी.मुदखेडे यांनी पिंपळगाव ग्रामपंचायत येथे कार्यरत असताना ग्रामपंचायत अभिलेखे नमुना नं.८ च्या शासकीय दस्तऐवजात नियमबाह्यपणे खाडाखोड केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. मुदखेडे यांच्या कामकाजासंदर्भात वरिष्ठांकडे अनेक तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने त्यांची सखोल चौकशी करण्यात आली. याप्रकरणी आर.जी. मुदखेडे यांनी जिल्हा परिषदेला आपला खुलासा देखील सादर केला होता. परंतु जाणिवपूर्वक कर्तव्यात कसूर करून हलगर्जीपणा केल्याच्या कारणावरून दि. १५ मे रोजी ग्रामपंचायत अधिकारी मुदखेडे यांच्या निलंबनाचे आदेश काढण्यात आले. निलंबन काळात मुदखेडे यांना हदगाव मुख्यालय देण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या या कारवाईने पंचायत समिती स्तरावर खळबळ उडाली आहे.

# कॉपी प्रकरणात हट्टा येथील बी. फार्मसीचे दोन परीक्षा केंद्र रद्द

## नवीन परीक्षा केंद्र परभणी येथील प्रेरणा कॉलेज ऑफ फार्मसी

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत विद्यापीठाच्या उन्हाळी–२०२५ या परीक्षा चालू आहेत. हट्टा येथील एस.व्ही.पी. कॉलेज आणि डिप्लोमा इन फार्मसी इन्स्टिट्यूट या दोन महाविद्यालयामध्ये बी. फार्मसी अभ्यास क्रमाचे विद्यार्थी परीक्षा देत होते. विद्यापीठाच्या भरारी पथकाने दि.१४ मे रोजी सदर परीक्षा केंद्रास अचानकपणे भेट दिली. या दरम्यान दोन्ही परीक्षा केंद्रावर सर्वाधिक विद्यार्थी बिनधास्त सामुहिक नक्कल करत असल्याचे निदर्शनास आले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी ही बाब अत्यंत गंभीररित्या घेऊन तात्काळ दोन्ही परीक्षा केंद्राची मान्यता रद्द केली. आणि या दोन्ही परीक्षा केंद्रावरील सर्व परीक्षार्थींची परीक्षा दि.१६ मे पासून परभणीच्या प्रेरणा कॉलेज ऑफ फार्मसी येथे घेण्यात येत आहे.

सर्व संबंधीत परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रात बदल झाल्याचे लक्षात घेऊन दि.१६ मे पासून परभणीच्या प्रेरणा कॉलेज ऑफ फार्मसी येथे उपस्थित राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

# पाकिस्तानला मिळणार आणखी एक झटका

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जम्मू–काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २७ हिंदू पर्यटकांचा नरसंहार केला होता. त्यानंतर भारताने पाकिस्तानशी असलेला सिंधी पाणी करार रद्द केला. आता आणखी एक पाऊल टाकत भारताने सिंधू पाणी करार स्थगित झाल्यापासून चिनाब, झेलम आणि सिंधू नद्यांवर प्रकल्पाचे काम वेगाने सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे सिंधू करार रद्द झाल्याने संकटात सापडलेल्या पाकिस्तानला आणखी एक झटका बसणार आहे.

# शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत विभाग स्तरावर नांदेड जिल्ह्यातील ६ कार्यालयांना प्रथम क्रमांक

## द्वितीय क्रमांकावर पाच कार्यालय तर चार कार्यालयांना तृतीय क्रमांक प्राप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिमेत विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या महाराष्ट्रातील तालुकास्तरीय शासकीय कार्यालयात दुसऱ्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर विभागात नांदेड जिल्ह्यातील ६ कार्यालयांना प्रथम क्रमांक मिळाला आहे. दुसऱ्या क्रमांकावर पाच कार्यालय असून चार कार्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी या नेत्रदीपक कामगिरीबद्दल या सर्व कार्यालयांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरीत तालुका स्तरीय शासकीय कार्यालयात नांदेड जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त उपविभागीय अधिकारी कार्यालय देगलूर, तहसिलदार नांदेड, उपअधिक्षक भूमि अभिलेख नांदेड, उपअभियंता म.जी.प्रा. नांदेड, उपअभियंता पाणी पुरवठा भोकर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी किनवट या सहा कार्यालयांचा यात समावेश आहे.

द्वितीय क्रमांक उपविभागीय पोलीस अधिकारी कंधार, पोलीस निरीक्षक भोकर, वन परिक्षेत्र अधिकारी माहूर, पशुधन विकास अधिकारी नांदेड, शहर उपविभाग १ नांदेड उपअभियंता महावितरण या पाच कार्यालयांना मिळाला आहे.

तर तृतीय क्रमांक दुय्यम निबंधक उमरी, तालुका वैद्यकीय अधिकारी मुदखेड, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा नांदेड, मुख्याधिकारी नगरपरिषद देगलूर या कार्यालयांना मिळाला आहे.

# राज्यातील आयजी/डीआयजी दर्जाच्या आणखी २६ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील आयजी/ डीआयजी दर्जाच्या आणखी २६ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

यामध्ये अनिल पारसकर – अप्पर पोलीस आयुक्त, संरक्षण व सुरक्षा, बृहन्मुंबई, शैलेश बलकवडे – अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, बृहन्मुंबई, एम. रामकुमार – संचालक, महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे (पद अवनत करून), शशीकुमार मीना – अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, बृहन्मुंबई, प्रवीण पाटील – अपर पोलीस आयुक्त, नागपूर, संजय बी. पाटील – अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर, वसंत परदेशी– अपर पोलीस आयुक्त, नागपूर शहर, एस.डी. आव्हाड – अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, एस. टी. राठोड – पोलीस उप महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, पी.पी. शेवाळे – पोलीस उप महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, बृहन्मुंबई, ए.एच. चावरिया – पोलीस आयुक्त, अमरावती शहर (पद अवनत करून), विनिता साहु – अपर पोलीस आयुक्त, सशस्त्र पोलीस दल, बृहन्मुंबई, पंकज देशमुख – पुणे अपर पोलीस आयुक्त, प्रसाद अक्कनवरु – पोलीस उप महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, बृहन्मुंबई, अमोघ गावकर – पोलीस उप महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (प्रशासन), **(पान ६ वर...)**

# नांदेड तहसीलचा मराठवाड्यात पहिला क्रमांक

## मुख्यमंत्री १०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा मोहिमेत लक्षणीय कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री १०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा विशेष मोहिमेंतर्गत नांदेड तहसील कार्यालयाने सर्वांगीण उत्कृष्ठ कामगिरी करत मराठवाडा विभागात अव्वल स्थान मिळवले आहे.

तहसीलदार संजय वारकड यांच्या नेतृत्वाखाली पारदर्शक, डिजीटल व नागरिकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण करण्यात आला आहे. राहुल कर्डिले जिल्हाधिकारी नांदेड, पांडुरंग बोरगावकर अपर जिल्हाधिकारी नांदेड, महेश वडतकर निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड, डॉ.सचिन खल्लाळ उपविभागीय अधिकारी नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली संजय वारकड तहसीलदार नांदेड यांनी नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे.

या मोहिमेंतर्गत नांदेड तहसीलने खालील महत्त्वाच्या बाबींमध्ये प्रगती साधली आहे. डिजीटल तहसील नांदेड अॅपच्या माध्यमातून २३ योजनांची माहिती व २० प्रकारच्या प्रमाणपत्रांसाठी अर्जाची सुविधा सुरू करण्यात आली आहे. या सेवांद्वारे आज पर्यंत अखेरपर्यंत १४,००० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. जलद प्रमाणपत्र वितरण सेवा सुरू करण्यात आली असून, २४ तासांत प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची सुविधा गुगल फॉर्मद्वारे उपलब्ध झाली आहे. आतापर्यंत २१७ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.



कार्यालयीन स्वच्छता, सुसज्ज प्रतीक्षागृह, आरओ फिल्टरड पाणी व्यवस्था, डिजिटल लायब्ररी व सायबर वॉल प्रकल्प राबवून कार्यालयात आधुनिकतेचा अवलंब करण्यात आला आहे. ई–ऑफिस प्रणालीच्या १००% अंमलबजावणीमुळे कार्यक्षमतेत मोठी वाढ झाली असून जानेवारी ते एप्रिल दरम्यान १२७ ई–फाईल्स आणि ५४४ ई–रजिस्टरचे कामकाज पार पाडले गेले. तक्रार निवारणासाठी 'लोकशाही दिन', 'आपले सरकार' व 'पीजी पोर्टल' यांचा प्रभावी वापर करून सर्व तक्रारींवर वेळेत कार्यवाही करण्यात आली आहे. एआय आधारित तंत्रज्ञान जसे की, चॅट जीपीटीचा वापर करून कामाच्या कार्यक्षमतेत नवचैतन्य निर्माण करण्यात आले आहे. नांदेड तहसीलची ही प्रगती केवळ तालुक्यापुरती मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या कामामध्ये नायब तहसीलदार स्वप्निल दिगलवार, काशिनाथ डांगे, नितेश कुमार बोलुलु, इंद्रजीत गरड, रवींद्र राठोड, सहायक महसूल अधिकारी देविदास जाधव, कोटूरवार, सुचिता बोधगिरे, सुरेखा सुरुंगवाड, मंडळ अधिकारी शिवानंद स्वामी, लक्ष्मण नरमवार, व्यंकटी मुंडे, संतोष निलावार, सचिन होंडाळकर, बालाजी निलमवार सर्वच तहसील कार्यालयातील महसूल सहायक कोतवाल मंडळींनी परिश्रम घेतले आहेत.

# वानखेडे स्टेडियमवरील स्टॅंडला रोहित शर्मासह शरद पवार यांचे नाव

**मुंबई (प्रतिनिधी)–** वानखेडे स्टेडियममध्ये शुक्रवारी सोहळा पार पडला. टीम इंडियाचा हिटमॅन, मुंबईचा अभिमान रोहित शर्मा याच्या नावाने स्टॅंडचं नामकरण करण्यात आले. कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर रोहित शर्मा पहिल्यांदाच अशा मोठ्या सोहळ्यात सहभागी झाला. या खास कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ज्येष्ठ नेते शरद पवार हे सुद्धा उपस्थिती होते. याचवेळी भारताचे माजी कर्णधार अजित वाडेकर आणि शरद पवार यांच्या नावाने देखील स्टॅंडचं नामकरण झाले. तसेच एमसीएचे माजी अध्यक्ष अमोल काळे यांच्या नावाने एमसीए ऑफिस लाउंजचं उद्घाटन झाले.

रोहितसह मुंबई क्रिकेट असोसिएशन माजी अध्यक्ष शरद पवार यांच्या नावाचंही स्टॅंड दिसणार आहे. त्यासह भारताचे माजी कर्णधार अजित वाडेकर यांचे नावही एका स्टॅंडला दिले गेले आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या या निर्णयामुळे वानखेडे स्टेडियमच्या गौरवशाली परंपरेत आणखी एक पर्व सुरू होणार आहे. वानखेडे स्टेडियम, जिथे रोहितने अनेक संस्मरणीय खेळी खेळल्या आहेत, तिथे आता रोहित शर्मा स्टॅंड म्हणून ओळखले जाणारे स्टॅंड असेल. वानखेडे स्टेडियममध्ये सचिन तेंडुलकर, सुनील गावसकर यांच्यासह अनेक दिग्गज क्रिकेटपटूंच्या नावावर स्टॅंड आहेत आणि रोहितचे नावही त्या यादीत जोडल्या गेले आहे.

वानखेडे स्टेडियमवरील पॅव्हेलियनच्या तिसऱ्या लेव्हलला रोहितचे नाव देण्यात येणार आहे. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने २०२४चा टी–२० विश्वचषक आणि २०२५ चा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकला आहे. जरी त्याने टी–२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी त्याचे यश कायमचे अमर राहील.


जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकल जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# युद्धात जिंकलो, पण...

आपला देशाच्या इतिहासामध्ये मुघलांविरुद्ध लढा करीत असताना आपण जवळपास सर्वच लढाई जिंकलो आहोत, परंतु तह करताना मात्र आपण हरलो आहोत. याच इतिहासाची पुनरावृत्ती भारत-पाक अघोषित युद्धामध्ये झाली आहे. पाकचा मुजोरपणा ठेचण्यासाठी आयतीच चालून आलेली संधी भारताने गमावली आहे. संपूर्ण लाहोर, कराची आणि इस्लामाबादपर्यंत आपला पोहोच झाला तरी आपण लांडग्याच्या शब्दावर विश्वास ठेवून शस्त्रसंधी केली. यामुळे पाकव्याप्त काश्मीर पुन्हा परत मिळविण्याची एक संधी हुकली असे म्हणावे लागेल. भारत आणि पाकिस्तान दरम्यानचे संबंध नेहमीच तणावपूर्ण राहिले आहेत. शेजारी राष्ट्र म्हणून पाकिस्तानकडून भारताबाबत सातत्याने शत्रुत्वाची भूमिका घेतली जाते, हे आता नव्याने सांगावे लागणार नाही. नुकतीच घडलेली घटनांची मालिका, आणि त्यात पाकिस्तानने पुन्हा एकदा दाखवलेली बेभरवशाची भूमिका, हे याचे आणखी एक उदाहरण ठरले आहे. ११ मेच्या निवांत दुपारी, एका नाट्यमय घडामोडीच्या पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तानकडून युद्धविरामाची अधिकृत घोषणा झाली. ही घोषणा भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने केली आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देखील भारत-पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधीबाबत मतैक्य झाल्याची माहिती दिली. त्यानंतर पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक डर आणि भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही ही गोष्ट अधिकृत केली. पण भारतातील जनभावना मात्र स्पष्ट होती की, पाकिस्तानच्या सततच्या कुरापतींना आता आळा घातलाच पाहिजे. भारताच्या भूमीवर सातत्याने हल्ले करणाऱ्या पाकपुरस्कृत अतिरेकी संघटनांनी भारतीयांच्या मनात खोलवर घाव घातले आहेत. किती निष्पाप जीव बळी गेले, किती महिला विधवा झाल्या, कुटुंबं उद्ध्वस्त झाली याचा हिशेब कोण देणार? त्यामुळे पाकिस्तानच्या कोणत्याही बोलण्यावर, विशेषतः युद्धविरामाच्या घोषणांवर, भारत विश्वास ठेवू शकत नाही, आणि याची प्रचिती काही तासांतच आली. सायंकाळी शस्त्रसंधी लागू होताच अवघ्या दोन तासांनंतर पाकिस्तानकडून ड्रोन हल्ले, तोफगोळ्यांचा मारा आणि गोळीबार पुन्हा सुरू झाला. जम्मू-काश्मीरपासून पंजाब आणि गुजरातपर्यंत सीमांवर अशांतता पसरली. ही उघड उघड फसवणूक आणि युद्धविरामाच्या संकल्पनेचा अवमान होता. त्यामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली की, पाकिस्तानची लोकशाही ही फक्त वरवरची असून खरे नियंत्रण लष्कराच्या हाती आहे. पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी अमेरिकेच्या दबावाला झुगारून युद्धविराम मोडीत काढला, हे चिंतेचे कारण आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष व्हान्स यांनी अगोदरच 'भारत-पाक संघर्षात आम्हाला देणेघेणे नाही' असे स्पष्ट केले होते. त्यामुळे ट्रम्प यांच्या घोषणेनंतर पाकिस्तानकडून झालेली ही कुरघोडी अत्यंत गंभीर बाब आहे. पाकिस्तानच्या अंतर्गत सरकार आणि लष्करामधील मतभेद हेच यामागचे मुख्य कारण असल्याची शक्यता आहे. अशा स्थितीत भारताने अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रकरणात भारताने आपली भूमिका अत्यंत संयमितपणे आणि ठामपणे मांडली. शस्त्रसंधीला होकार देतानाच, आमची सैन्य आणि सुरक्षा यंत्रणा सज्ज राहील, हे स्पष्ट करून भारताने आपली दूरदृष्टी दाखवली आणि ते खरेच पडले. पाकिस्तानने पुन्हा हल्ला केला, तरी भारतीय यंत्रणांनी त्याला तत्काळ प्रत्युत्तर दिले. ही सज्जता हीच आपल्या सुरक्षेची खरी हमी आहे. पाकिस्तानच्या पाठीशी असलेला चीन हा देखील एक मोठा धोका आहे. उघडपणे समोर न येता, तुर्कस्तानसारख्या देशांच्या माध्यमातून पाकला रसद पुरवून चीन भारताच्या विरोधात खेळी करत आहे. पण भारत आता १९६२ चा भारत राहिलेला नाही. चीनच्या या डावपेचांना योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने उत्तर दिले जाईल, याची खात्री बाळगायला हरकत नाही. सध्याची स्थिती अशी आहे की, तालिबान, बलुचिस्तान आणि सिंधमधील स्वातंत्र्याचे आंदोलन पाकिस्तानसाठी डोकेदुखी बनले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानची स्थिती कमकुवत झाली आहे. अशा वेळी भारताला मिळालेली ही एक उत्तम संधी आहे की, पाकिस्तानची शस्त्रे निष्प्रभ करणे आणि जगासमोर त्याचा खरा चेहरा उघड करणे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारतात राजकारण सुरू झाले. काही लोकांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदींची तुलना करून टीका केली जात आहे. हे गैरसमज आणि राजकीय हेतूने केलेले आरोप आहेत. भारताने युद्धविराम जरी स्वीकारले, तरी काही अटी घालून. त्या अटी काय आहेत हे स्पष्ट होताच पाकिस्तानसमोरची अडचण अधिकच वाढणार आहे. पाकिस्तानची ही 'मुजोरी' आता सहन करण्याची वेळ निघून गेली आहे. भारताने आता कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे. प्रत्येक वेळेस शांततेचा हात पुढे करून फसवणूक पत्करण्याची ही साखळी संपवायचीच आहे. आपल्या शहीद जवानांच्या बलिदानाचा आदर ठेवत, भारताने आता निर्णायक कारवाईची दिशा ठरवावी आणि देशवासीयांना सुरक्षिततेचा दृढ विश्वास द्यावा, हीच वेळेची गरज आहे.

# चोखा चोखट निर्मळ। तया अंगी नाही मळ।।

वारकरी संप्रदायाचा इतिहास मोठा क्रांतिकारी असून सर्वकाळ समाजाला मुळातून हलवण्याचे महत्कार्य वारकरी संत समाजसुधारकांनी केलेले सहजच समोर येते. नामदेव-ज्ञानदेवांच्या अगोदरपासून महाराष्ट्रात वारकरी परंपरा सुरु होती याचा उल्लेख संत नामदेवांच्या चरित्रात आढळून येतो. तेराव्या शतकात वारकरी चळवळ पुनरुज्जीवीत करण्याचे श्रेय सर्वप्रथम संत नामदेव-संत ज्ञानदेवादी संत प्रभावळीला जाते.या संत प्रभावळीत प्रामुख्याने संत सावता महाराज, संत जनाबाई, संत ज्ञानदेव, संत नरहरी महाराज, संत मुक्ताई, संत सेना महाराज, संत परिसा भागवत, संत विसोबा खेचर, संत बंका महाराज, संत जगमित्र नागा, संत सोयराबाई, संत निर्मळा, संत कान्होपात्रा आदि संतांची मांदियाळी पंढरीच्या वाळवंटात एकत्र जमून मोठं क्रांतिकारी कार्याला प्रारंभ केला होता. पंढरपुरचे वाळवंट केवळ भक्तीचे ठिकाण राहिले नसून ते मूलगामी वारकरी संप्रदायाच्या रुजावणूकीचे ठिकाण झाले होते. यातच संत जनाबाई आणि संत नामदेव भजन-कीर्तन करतांना अभंग लेखन करायला लागले. संत नामदेवांचा हा वसा-वारसा इतर संतांनी उचलला आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन अन्य संतांची मांदियाळी अभंग लेखनाला लागली.



संत नामदेवांच्या प्रभावळीतील अग्रगण्य नाव म्हणजे संत चोखामेळा महाराज! संत चोखोबाराय विदर्भातील मेहून गावावरून पंढरपूरला स्थायिक झालेले श्री विठ्ठलाचे निष्ठावंत वारकरी! तेरावे शतक मोठे आव्हानात्मक होते. तत्कालीन समाजात वर्णव्यवस्था आणि जाती व्यवस्था अगदी खोलवर रुतलेली होती. कर्मकांड, थोतांड, देवभोळेपणा इत्यादींनी थैमान घातले होते. देव आणि धर्माची भीती समाजमनात खोलवर रुजली होती. ब्राह्मणेत्तरांना वाचन, लेखन, भजन, कीर्तन, भाषण इत्यादींचा अधिकार नव्हता. याचा प्रत्यय स्वतः ज्ञानदेवादी भावंडांना आला होता. असे असले तरी संत जनाबाई, संत नामदेव आणि त्यांच्या घरातील सर्वजण अभंग लेखन करत होते. दुसरीकडे संत नामदेव वाळवंटात आपल्या सख्या वारकरी मेळ्यात कीर्तन करायला लागले होते. या संतांच्या मांदियाळीत अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या तत्कालीन महार जातीतील जन्मलेले संत चोखोबाराय प्रतिभावंत वारकरी होते. सगळे काही प्रतिबंध असतांना चोखोबाराय पांडुरंगाची भक्ती करण्याची सोडत नव्हते. चोखोबारायांना पांडुरंगाच्या मंदिरात प्रवेश निषिद्ध होता. असे असतांना चोखोबाराय एकटे पडले होते. त्यांना धीराची गरज असतांना संत नामदेव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यामुळे चोखोबांना धीर आला. एवढेच काय संत नामदेवादी संत मांदियाळी मिळून चोखोबांच्या घरी जाऊन भजन-कीर्तन करू लागले. यातच नामदेवांना चोखोबांनी लिहिलेले अभंग दाखविले आणि ते अभंग वाचून नामदेवराय आश्चर्य चकित झाले. नामदेव महाराजांना खूपच आनंद झाला आणि चोखोबांना लेखन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यानंतर नामदेव आणि चोखोबाराय दिवसभर भजन, कीर्तन, अभंगावर चर्चा करत बसत असत. याचा परिपाक असा झाला की; संत नामदेवांच्या कुटुंबाप्रमाणे संत चोखोबा महाराजांचे संपूर्ण कुटुंबच अभंग लेखनात डुंबून गेले. चोखोबांच्या धर्मपत्नी सोयराबाई, बहिण निर्मळा, मेव्हणा बंका आणि विशेष म्हणजे चोखोबांचे चिरंजीव कर्ममेळा सुद्धा अभंग लिहायला लागले. संत नामदेव चोखोबाराय आणि कुटुंबियांचे गुरु झाले आणि सुरु झाला नवनिर्मिती लेखनाचा इतिहास!

प्रतिभा कुणाची जागीर नाही. जीवापाड प्रेम करणाऱ्यावर प्रतिभा प्रेम ओसंडत असते. चोखोबाराय अस्पृश्य जातीतून आले असतांना सुद्धा आपल्या अभंगाद्वारे श्री विठ्ठलाप्रती आपली असीम भक्ती प्रकट करत असले तरी त्यांच्या अभंगातून तत्कालीन समाज व्यवस्थेविरुद्ध काही महत्वपूर्ण प्रश्न उपस्थित होतांना दिसतात. चोखोबाराय आपल्या

धिक् तो आचार धिक् तो विचार।
धिक् तो संसार धिक् जन्म ।।१।।
धिक् तें पठण धिक् तें पुराण ।
धिक् यज्ञ हवन केलें तेणें ।।२।।
धिक् ब्रम्हाज्ञान वाउग्या ह्या गोष्टी।
दया क्षमा पोटी शांति नाहीं ।।३।।
धिक् ते आसन जटाभार माथा।
वायांचि हे कंथा धरिली जेणें ।।४।।
(चोखामेळा, १६२)

या अभंगांच्या जोडीला चोखोबा

कोण तो सोंवळा कोण तो वोंवळा।
दोहींच्या वेगळा विठ्ठल माझा ।।१।।
कोणासी विटाळ कशाचा जाहला।
मुळींचा संचला सोंवळाची ।।२।।
पांचाचा विटाळ येकचिये आंगा।
सोंवळा तो जगामाजी कोण ।।३।।
चोखा म्हणे माझा विठ्ठल सोंवळा।
अरूपें आगळा विटेवरी ।।४।।

आणि

उपजले विटळीं मेले ते विटाळीं।
राहिले विटाळीं ते ही जाती ।।१।।
रडती पडती ते ही वेगें मरती।
परि नाम न गाती भुली भ्रमें ।।२।।

अशा अभंगातून तत्कालीन व्यवस्थेवर सडेतोड भाष्य करतांना दिसतात. याच्या जोडीनेच त्यांचे हीन याती माझी देवा, भेदाभेद कर्म न कळे त्याचे वर्म आदि अभंगातून व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस चोखोबा करतांना त्यांच्यातील प्रतिभा आणि भक्तीची शक्ती दृष्टीआड होत नाही. एकदा तर मंदिरात आल्यामुळे बडव्यांनी त्यांना प्रचंड मार देत असतांना चोखोबाराय असहायपणे धाव घाली विठू आता नको चालू मंद आपली हतबलता व्यक्त होतात.

असे असले तरी चोखोबा हे एक प्रतिभासंपन्न वारकरी संत होते ज्यांच्या अभंगातून जीवनाचे मूलगामी तत्वज्ञान स्त्रवतांना दिसते. त्यांचे अनेक अभंग आजही आपल्याला समकालीन वाटतात. जसे

ऊंस डोंगा परी रस नव्हे डोंगा।
काय भुललासी वरलीया रंगा ।।१।।
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा।
काय भुललासी वरलीया रंगा ।।२।।
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगें।
काय भुललासी वरलिया रंगें ।।३।।
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।४।।

अभंग वाचला की कुणीही आणि कशावरही अहंकार असलेला माणूस क्षणार्धात नामोहरम झाल्याशिवाय राहणार नाही. संत चोखोबांच्या भक्ती आणि प्रतिभेने त्यांच्या समकालीन संत नामदेवांना असे प्रभावीत केले की; नामदेवांना

चोखा माझा जीव चोखा माझा भाव।
कुलधर्म देव चोखा माझा।।१।।
काय त्याची भक्ति काय त्याची शक्ती।
मोही आलो व्यक्ति तयासाठी ।।२।।
माझ्या चोखियाचे करिती जे ध्यान।
तया कधी विघ्न पडो नदी ।।३।।
नामदेवे अस्थि आणिल्या पारखोनी।
घेत चक्रपाणी पितांबर ।।४।।

असे एक ना अनेक अभंग लिहून आपल्या मित्राची भलावण केली आहे. त्याचबरोबर चोखोबांचे मेहुणे बंका

चोखा चोखट निर्मळ। तया अंगी नाही मळ।।
चोखा प्रेमाचा सागर। चोखा भक्तिचा आगर।।
चोखा प्रेमाची माउली। चोखा कृपेची साऊली।।
चोखा मनाचे मोहन। बंका घाली लोटांगण।।

असा अभंग लिहून संत चोखोबाराय किती निर्मळ, सरळ, प्रेमळ भक्त आहेत याचा दाखला देऊन जातात.

आज संत चोखोबाराय पुण्यतिथी निमित्ताने त्यांचा खडतर काळ आणि त्यातून त्यांनी केलेली अभंग निर्मिती ही आपल्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. संत आपल्या अलौकिक अभंगांनी आजही आपल्या सोबत असून त्यात चोखोबांचे अभंग मोठे रसाळ, लडिवाळ, भक्तीने वाहणारे आहेत. आज आपल्याला सर्व गोष्टी अनुकूल असून आणि आपल्याकडे उच्च शिक्षण, सर्व साधनांची दाटी असतांना सुद्धा अत्यल्प लोक लेखन करतात याची खंत वाटते. तेंव्हा चला, माय-बापहो आपणही लिहून अक्षर आणि पुस्तक रूपाने मागे राहूया! जय चोखोबाराय!

**प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

# तेजस्वी मुलांना वाचवण्याचे आव्हान



दरवर्षी, बारावीचे निकाल आणि वैद्यकीय प्रवेश क्रमवारी जाहीर होताच, आपण टॉपरचा आनंद साजरा करतो, परंतु अनेकदा या हास्यामागील लपलेले दुःख आपल्याला आठवते. वाईट म्हणजे, कधीकधी आपल्याला हृदयद्रावक बातम्या ऐकायला मिळतात. बीड येथील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका हुशार तरुण विद्यार्थ्याने आपले जीवन संपवले आहे. अशा कित्येक पाहायला मिळतात. या काही वेगळ्या घटना नाहीत. असे का होते याचा विचार गरजेचे आहे. याचा अर्थ असा आहे की, आपण आपले आपल्या मुलांचे तेजस्वी मन, हे शाळेतील टॉपर आणि अगदी वैद्यकीय विद्यार्थी तणाव, चिंता आणि नैराश्याच्या मूक साथीत गमावत आहोत.

राज्य बोर्ड परीक्षेपासून ते वैद्यकीय महाविद्यालयांपर्यंत विद्यार्थ्यांवरील परीक्षा पास होण्याचा दबाव कधीच संपत नाही. वैद्यकीय शिक्षण देशामध्ये सगळ्यात आकर्षक झाले आहे. म्हणूनच भारतात वैद्यकीय शास्त्रात प्रवेश मिळवणे हे वैभवाचा मुकुट मानले जाते. एक निष्णात डॉक्टर तयार होण्यासाठी त्याने वर्षानुवर्षे केलेली अथक तयारी, रात्रीचा निद्रानाश, एकटेपणा आणि खोल भावनिक ताण सहन केलेला असतो. याची जाणीव सामान्य माणसांना नाही. टॉपरसाठी, एक अनपेक्षित धक्का बसतो जेव्हा त्याच्या रँकमध्ये घसरण होते. त्याला हे अपयशासारखी सारखे वाटते. केवळ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश करणाऱ्यांसाठी संघर्ष थांबत नाही. खरं तर, तो वरचेवर तीव्र होत जातो. पदवी शिक्षण घेतल्यानंतर पुन्हा पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रवेशासाठी संघर्ष करावा. ज्या विद्यार्थ्यांना हा ताण सहन होत नाही ते जीवन संपविण्याचा टोकाचा निर्णय घेतात आणि संपूर्ण देशाला यातून संपूर्ण देशाचे नुकसान होते.

टॉपर्स आणि मेडिकलचे विद्यार्थी आपले जीवन का संपवतात? यामागे अनेक कारणे आहेत. जसे उच्च पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी अनेकदा त्यांच्या आत्मसन्मानाला यशाशी जोडतात, अपयशाची भीती सतावते, त्याच्याभोवती निराशाजनक कुटुंब किंवा समाज असतो, अति शैक्षणिक ओव्हरलोड अभ्यास करावा लागतो आणि त्यातून जीवघेणी स्पर्धा सुरू होते, हा ताण सहन करण्याच्या यंत्रणेचा आणि करण्यासाठी त्याला भावनिक आधाराचा अभाव आधार देणारा कोणी नसतो आणि अशा विद्यार्थ्यांना मिळणारी अपुरी विश्रांती, योग्य पोषणाचा अभाव आणि बर्नआउट आणि सातत्याने असणारा अभ्यासाचा ताण. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून हा ताण सहन न करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संयमाचा कडेलोट होतो.

**वैद्यकीय महाविद्यालयातील शोकांतिक :** एमबीबीएस विद्यार्थ्यांमध्ये आणि अगदी पदव्युत्तर पदवीधरांमध्येही आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनकपणे वाढले आहे. अनेक विद्यार्थी त्यांच्या मनावरील ताण शांतपणे सहन करतात आणि यशस्वी होतात. पण काही विद्यार्थी त्यांची भीती, दुःख व्यक्त करू शकत नाहीत किंवा तसे करण्यासाठी सुरक्षित त्यांच्याकडे व्यक्ती नसते. जास्त कामाचे तास, झोपेची कमतरता, रॅगिंग, सहाय्यक मार्गदर्शकांचा अभाव आणि अपेक्षांचे सतत ओझे यामुळे मेडिकल कॉलेज उच्च दाब सहन करीत असतात.

**आता बदलण्याची गरज आहे :**

**१. शिक्षक आणि मार्गदर्शक:** प्राध्यापकांनी मूल्यांकनापलीकडे योग्य पद्धतीने मूल्यमापन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाकडे जावे मार्गदर्शन करावे व त्यांना भावनिक आधार द्यावा. विद्यार्थ्यांना सहानुभूती देऊन त्यांचा जीव वाचवू शकते वाचविला जाऊ शकतो. महाविद्यालयांनी प्रशिक्षित मानसिक आरोग्य व्यावसायिक नियुक्त करावेत, कल्याण केंद्रे स्थापन करावीत आणि नियमित मानसिक आरोग्य सत्रे आयोजित करावीत.

**२. पालक आणि कुटुंबे:** वैद्यकीय प्रवेश हा कुटुंबाचा सन्मान मानला जाऊ नये. मुलांना कळवा की त्यांचे मूल्य त्यांच्या पदव्या किंवा पदवींमुळे नाही तर ते कोण आहेत यावरून आहे. भावनिक सुरक्षितता घरापासून सुरू होते हे ओळखले पाहिजे.

**३. विद्यार्थी:** मदत घेणे हे कमकुवतपणाचे नव्हे तर ताकदीचे लक्षण आहे, हे विद्यार्थ्यांनी जाणले पाहिजे. जर तुम्हाला त्यांना दडपल्या दडपण आल्यासारखे वाटत असेल तर त्यांनी आपले मित्र, वरिष्ठ, सल्लागार किंवा हेल्पलाइनशी बोला बोलले पाहिजे. तुम्ही एकटे नाहीत आणि तुमचे जीवन, तुमच्यासाठी, तुमच्या कुटुंबासाठी आणि देशासाठी अत्यंत मौल्यवान आहे, ओळखा.

**४. संस्था आणि धोरणकर्ते:** प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये मानसिक आरोग्य समुपदेशन केंद्र, रॅगिंगविरोधी अंमलबजावणी करणारी यंत्रणा, अभ्यासाची व विश्रांती सोय आणि तक्रार निवारण प्रणाली कार्यरत असावी. त्याचप्रमाणे दरवर्षी प्रत्येक महाविद्यालयात आत्महत्या ऑडिट आणि मानसिक आरोग्य सर्वेक्षण पारदर्शकपणे केले पाहिजेत.

**५. समाज आणि माध्यमे :** समाजाने आज माध्यमाने फक्त उच्च पदांचे गौरव करणे थांबविले पाहिजे. त्यांनी अडचणींनंतर पर्यायी मार्ग शोधणाऱ्यांच्या प्रसिद्ध केल्या पाहिजेत. डॉक्टर म्हणून, मी पाहिले आहे की जीवन किती नाजूक आहे. एक शिक्षक आणि पालक म्हणून, मी पाहिले आहे की तरुणांना ऐकले जाणे, सुरक्षित असणे आणि आदर वाटणे किती महत्त्वाचे आहे. बारावीचा टॉपर असो किंवा वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचा विद्यार्थी असो कुणालाही असे वाटू नये की त्यांचे जीवन संपवणे हा एकमेव पर्याय आहे. विद्यार्थ्यांनी जिथे गरज वाटेल तेथेमदत मागणे हे लज्जेचे नव्हे तर धैर्याचे प्रतीक आहे, हे समजून पाहिजे.

**-डॉ. प्रकाश चव्हाण**
अस्थिरोग तज्ज्ञ
(श्रीनिवास ऑर्थोपेडिक नर्सिंग होम, नांदेड)

# कृतघ्न तुर्की, अझरबैजानवर भारताचे बहिष्कार अस्त्र

पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे भ्याड हल्ला करून २६ निष्पाप पर्यटकांना ठार केले. या भ्याड हल्ल्याने भारतात संतापाची लाट उसळली. या हल्याचा जगभर निषेध केला गेला. भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिन्दुर मोहीम राबवून पाकव्याप्त काश्मीरमधील अतिरेक्यांचे अड्डे नष्ट केले. ऑपरेशन सिन्दुर मोहिमेत भारतीय सैन्यदलाने शंभरहून अधिक जहाल दहशतवाद्यांना यमसदनी पाठवून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवताना फक्त दहशतवाद्यांना टार्गेट केले.

भारताने पाकिस्तानी नागरिक किंवा सैन्यदलाला इजा पोहचवली नाही असे असतानाही पाकिस्तानने भारताच्या नागरी वस्तीवर आणि भारतीय सैन्यदलावर ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला अर्थात भारतीय सैन्यदलाने हा हल्ला परतावून लावतानाच थेट पाकिस्तानात घुसून पाकिस्तानचे हवाई अड्डे नष्ट केले. भारत पाकिस्तान दरम्यान सुरू झालेल्या या युद्धात कारण नसताना तुर्की आणि अझरबैजान या दोन देशांनी पाकिस्तानची बाजू उचलून धरली इतकेच नाही तर तूर्कीने थेट पाकिस्तानला लष्करी मदत करत पाकिस्तानला ड्रोन आणि इतर लष्करी साहित्य पुरवले. पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्यासाठी जे ड्रोन पाठवले होते ते तुर्की या देशानेच दिले होते अर्थात भारताच्या भक्कम संरक्षण दलाने ते हवेतच भेदून टाकले.

तुर्की या देशाने पाकिस्तानला मदत करताना थेट भारतावर टीका केली की भारतानेच पाकिस्तानवर हल्ला केला म्हणून त्यांनी पाकिस्तानला मदत केली. वास्तविक पाकिस्ताननेच दहशतवादी हल्ला घडवून आणला त्यामुळे पुढील संघर्ष निर्माण झाला हे संपूर्ण जग मान्य केले असताना तुर्की मात्र हे मान्य करायला तयार नाही याचा अर्थ पाकिस्तानने भारतात दहशतवादी कारवाया कराव्यात, आमच्या निष्पाप नागरिकांना मारावे आणि आम्ही ते निमूटपणे पाहत बसावे असे तूर्कीला सुचवायचे आहे का? तुर्की प्रमाणेच अझरबैजान या देशाने ही पाकिस्तानला पाठिंबा देत भारतावर टीका केली. या दोन्ही देशांनी पहलगाम हल्लयाचा निषेध केला नाही मात्र भारतावर टीका करत पाकिस्तानला पाठिंबा दिला. या दोन्ही देशांचा हा कृतघ्नपणाच आहे. कारण या दोन्ही देशांना भारताने वेळोवेळी मदत केली आहे. या दोन्ही देशांना भारताने आपले मित्र राष्ट्र मानले आहे. या देशांनी मात्र भारताशी मैत्री निभावणे तर सोडाच पण भारताचा शत्रू असलेल्या पाकिस्तानला मदत करून भारताशीच शत्रुत्व पत्करले आहे.

भविष्यात याचा त्यांना मोठा फटका बसणार हे निश्चित. २०२३ साली तुर्की आणि सीरिया या देशात मोठा भूकंप झाला होता. या भूकंपात तूर्कीची मोठी वित्त आणि जीवितहानी झाली होती. या भूकंपात तूर्कितील ५० हजारांहून अधिक नागरिक मरण पावले होते. तुर्कीवर आलेल्या या नैसर्गिक संकटात भारताने आपली मैत्री निभावत तुर्कीला अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू, औषधे यांचा पुरवठा केला. दुसऱ्या कुठल्या देशाच्या आधी भारताने या देशांना मानवी सहाय्य पुरवण्यासाठी धाव घेतली. त्यासाठी भारताने ऑपरेशन दोस्ती मोहीम राबवली.

ऑपरेशन दोस्ती मोहिमेअंतर्गत भारताने तुर्कीला संकट काळात मदत केली त्यामुळे तेथील जनतेने भारताचे आभार मानले मात्र तेथील सरकारने काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानला पाठींबा देत कृतघ्नपणा केला आणि आता युद्धात पाकिस्तानच्या बाजूने उभे राहून भारताशी शत्रुत्व पत्करले. दरवर्षी लाखो भारतीय तुर्कीला भेट देतात. त्यातून त्यांना वर्षाला तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो.

अझरबैजान या देशातही लाखो भारतीय पर्यटक भेट देतात. त्यांची अर्थव्यवस्थाही भारतीय पर्यटकांवर अवलंबून आहे. या दोन्ही देशातून भारतात व्यापार चालतो. तुर्की या देशातून मोठ्या प्रमाणात फळांची आयत होते. तुर्की या देशातून येणाऱ्या सफरचंदाला भारतात मोठी मागणी आहे. तुर्की आणि अझरबैजान या देशात चित्रपट निर्माते, दिग्दर्शक चित्रपटांचे, मालिकांचे आणि वेबसिरिजचे चित्रीकरण करतात त्यातूनही त्यांना मोठा महसूल मिळतो आता या दोन्ही देशांनी जो कृतघ्नपणा केला त्यामुळे या दोन्ही देशांविरुद्ध भारतात संतापाची लाट उसळली असून या दोन्ही देशांना धडा शिकवण्यासाठी बॉयकॉट तुर्की अँड अझरबैजान ही मोहीम भारतात राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत भारतातील नागरिक या दोन्ही देशांवर बहिष्कार टाकत आहेत.

बॉलिवूडने तुर्की आणि अझरबैजान या दोन्ही देशात चित्रीकरण करण्यास नकार दिला असून या देशांवर बहिष्कार टाकला आहे. पर्यटक व्यावसायिकांनीही या दोन्ही देशातील आपले बुकिंग रद्द करून त्यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. व्यापाऱ्यांनीही तूर्कितून येणाऱ्या वस्तूंवर बहिष्कार टाकला आहे. भारताचे हे बहिष्कार अस्त्र या दोन्ही देशांच्या मुळावर येणार आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशांवर टाकलेल्या या बहिष्कार अस्त्राने या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था गोत्यात येऊ शकते. असंगाशी संग केल्याचा परिणाम या दोन्ही देशांना भविष्यात भोगावा लागणार आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### धनश्री चिंतलेला दहावीत ९६.६० टक्के गुण

**शंकरनगर (प्रतिनिधी)**– कोरोनामध्ये वडिलाचे छत्र हरवले. घरची परिस्थिती बेताची परंतु खचून न जाता आईच्या आणि मामाच्या पाठबळावर कु. धनश्री उर्फ धुरपता नागनाथ चिंतले हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये ९६.६०% गुण पटकावून गोदावरी मनार पब्लिक स्कुलमधून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे.



संस्थेचे अध्यक्ष माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, सचिव डॉ. मीनल पाटील खतगावकर, बाळासाहेब पाटील खतगावकर, रवी पाटील खतगावकर, प्राचार्य डि. पी. पाण्डेय, प्राचार्य धनंजय शेळके, कोकणे माधव, वर्गशिक्षक तेजप्रकाश तिवारी, श्याम जाधव, इज्जपवार, खतगावचे सरपंच मलाबाई पेटेकर, सौ.अनुसया कोकणे, रमेश मोहिते, मण्णा चिंतले, संभाजी कोकणे, लक्ष्मण कोकणे, बंटी पेटेकर आदिंनी तिचे अभिनंदन केले आहे.

### काही रेल्वेगाड्या तात्पुरत्या रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागातील काही रेल्वे गाड्या तांत्रीक कारणामुळे तात्पुरत्या रद्द करण्यात आल्या आहेत. गाडीसंख्या १७४०९ / १७४१० आदिलाबाद हुजूर साहिब नांदेड – आदिलाबाद, ५७६५७ / ५७६५८ पूर्णा –परळी– पूर्णा, ७७६४६ / ७७६४५ हुजूर साहिब नांदेड – निजामाबाद – हुजूर साहिब नांदेड, ७७६०९ / ७७६१० अकोट–अकोला–अकोट, ५७६५१ हुजूर साहिब नांदेड मनमाड ह्या गाड्या दि. १७ ते १९ मे रद्द करण्यात आल्या आहेत. तर गाडीसंख्या ५७६५२ मनमाड – हुजूर साहिब नांदेड ही दि. १८ ते २० मे दरम्यान रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती 'दमरे'च्या नांदेड विभागाने दिली आहे.

# नांदेडच्या जुन्या शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, शहरवासियांतून संताप



**नांदेड (प्रतिनिधी)** – जुन्या नांदेड शहरातील जुना भाग परिसरातील रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून पूर्णपणे खराब अवस्थेत आहे. या रस्त्यावरून दररोज हजारो नागरिक प्रवास करतात, मात्र मनपाकडून याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे.

कधी काळी या रस्त्याचे गटारी व रस्ता रुंदीकरणाचे काम करण्यात आले होते. पण त्यानंतर आजपर्यंत दुरुस्ती किंवा डांबरीकरणाचे कोणतेही काम झालेले नाही. परिणामी, या रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच दयनीय होत आहे.

गटारातील साचलेले पाणी आणि खराब रस्त्यामुळे या परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नाल्यांमधील घाण पाणी रस्त्यावर साचते आणि त्यावरून चालणे म्हणजे दिव्य कसरत करावी लागत आहे. त्यामुळे अपघात होत असून आजार पसरत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या मते, मनपाकडून वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नाही. लोकप्रतिनिधींनी आणि नगरसेवकांनी केवळ आश्वासनांपलिकडे काहीच केलेले नाही. दररोज कामावर जाताना चिखल, पाणी आणि खड्ड्यांतून वाट काढावी लागते. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच याचा त्रास सहन करावा लागत आहे. आम्हाला सुस्थितीतील रस्ता करून द्यावा, अशी मागणी या परिसरातील रहिवाशांकडून केली जात आहे.

**स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष का?**

हा रस्ता केवळ जुन्या शहराशीच नव्हे, तर आसपासच्या भागांशीही जोडलेला असून, त्यामुळे वाहतुकीची व नागरिकांच्या दैनंदिन हालचालींसाठी महत्त्वपूर्ण आहे. अशा महत्त्वाच्या रस्त्याकडे मनपा आणि प्रशासनाने दुर्लक्ष का केले आहे, असा प्रश्न आता नागरिक उपस्थित करत आहेत.

नागरिकांनी लवकरात लवकर रस्त्याची डागडुजी करून डांबरीकरण करावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा, येत्या काळात नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# लोहा व कंधार तालुक्यातील लाभार्थ्यांनी पंतप्रधान आवास योजनेचे अर्ज ३१ मे पर्यंत करावेत –आ. चिखलीकर





**लोहा (प्रतिनिधी)**– पंतप्रधान आवास योजना टप्पा २ अंतर्गत ग्रामीण भागात सर्वेक्षणाची मुदत ३१ मे पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे लोहा व कंधार तालुक्यातील घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांनी पंतप्रधान आवास योजनेचे अर्ज दि.३१ मे २०२५ पर्यंत दाखल करावेत असे आवाहन लोहा –कंधार मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे याबाबत मागणी केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मुदत वाढवून दिली आहे.

पंतप्रधान आवास योजनेच्या सर्वेक्षणाला काही तांत्रिक कारणांमुळे अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे या योजनेपासून कोणताही गोरगरीब लाभार्थी वंचित राहू नये म्हणून आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पंतप्रधान आवास योजनेच्या सर्वेक्षणाला १५ दिवसांची मुदतवाढ द्यावी अशी मागणी केली होती.

पंतप्रधान आवास योजना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महत्त्वपूर्ण योजना काढली आहे. या योजनेच्या माध्यमातून गोरगरीब बेघरांना तसेच कच्च्या घरात राहणाऱ्या नागरिकांना पक्के घर मिळणार आहे.

त्यामुळे या योजनेचे काटेकोरपणे पालन व्हावे, कोणताही गोरगरीब पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये अशी भूमिका आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी घेतली आहे. त्यामुळेच सदरील सर्वेक्षणाची मुदत दि. ३१ मे पर्यंत वाढविण्यात आली आहे .

त्यामुळे प्रशासनाने या योजनेची मोठ्या व्यापकपणे जनजागृती करुन सर्व पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, ग्राम पंचायतीचा ग्राम पंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा व न.प. क्षेत्रातील लाभार्थ्यांनी मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

# २० तारखेपासून घरकुल लाभार्थ्यांना मिळणार वाळू

**माहूर (प्रतिनिधी)**– घरकुलासाठी मोफत वाळू उपलब्ध करून देण्याचे शासनाचे स्पष्ट निर्देश आल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना आदेशित करून तत्काळ वाळू गट निश्चिती करत घरकुल लाभार्थ्यांना २० मे ते ९ जून पर्यंत देण्याचे आदेश दिले आहेत.

पंचायत समिती अंतर्गत तालुक्यात सात हजारांवर तर शहरातही ११०३ घरकुले मंजूर आहेत. सध्या सर्वच घरकुलांचे काम सुरू असल्याने तसेच दोन महिन्यांपासून वाळू उपलब्ध नसल्याने घरकुल लाभार्थी प्रचंड अडचणीत आले होते. पिवळी वाळू पंधरा हजार रुपये ब्रास घेणे शक्य नसल्याने घरकुल लाभार्थ्यात अस्वस्थता पसरली होती. परंतु शासनाने घरकुलासाठी पाच ब्रास मोफत वाळू देण्याचे निश्चित केले. त्यामुळ घरकुलांसाठी मोफत वाळू मिळणार आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार तहसीलदार किशोर यादव यांनी गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्याकडून घरकुल लाभार्थ्यांची यादी मागविली आहे. वाळू वाटप समितीची बैठक होऊन निश्चित केलेल्या वाळू गटातून घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून येणार असल्याने घरकुल लाभार्थ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

# ३० जूनपासून भक्ती लॉन्स येथे श्री गुरुचरित्र पारायण व कथामृत सोहळा






**नांदेड (प्रतिनिधी)** – गुरुतत्व प्रदीप, परिवार नांदेडच्यावतीने दि. ३० जून ते दि. ७ जुलै दरम्यान भक्ती लॉन्स, मालेगाव रोड नांदेड येथे १००८ श्री गुरुचरित्र सारामृत पारायण व श्री गुरुचरित्र कथामृत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गुरुचरित्र कथामृतातून कथाकार प. पू. श्री मकरंद महाराज (पिठाधिपती, श्री क्षेत्र दत्तधाम, परभणी) आपल्या रसाळ व ओघवत्या वाणीतून श्री गुरुचरित्र ग्रंथाचे पारायण करणार आहेत.

अ.भा. ब्राह्मण महासंघाचे निखिल लातूरकर यांच्या निवासस्थानी या सोहळ्याची रूपरेषा सांगताना मकरंद महाराज म्हणाले की, श्री गुरुचरित्रातील शिकवण घरोघरी पोहोचावी यासाठी गुरुतत्व प्रदीप या परिवारातर्फे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. देशाला सद्यस्थितीत विदेशी शक्तीपासून येणाऱ्या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी आध्यात्मिक दृष्टीने पाठबळ देणे गरजेचे आहे. श्री दासगणू महाराज लिखित गुरुचरित्र ग्रंथ लिखाणाची समाप्ती नांदेड येथेच झाली. यामुळे या पारायण सोहळ्याला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. पारायणासाठी २१०० वाचकांचा संकल्प असून आतापर्यंत महिला–पुरुष अशा १९०० वाचकांनी नोंदणी केली आहे. किमान अडीच हजार वाचक पारायणासाठी बसतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

दक्षिण गंगा गोदावरी मातेच्या नाभीस्थानी वसलेल्या नांदेड नगरीमध्ये ११ पारायणाच्या मालिकेतील ८ वे पुष्प आयोजित करण्यात आलेले आहे. यापूर्वी ७ पारायणे कात्रज (पुणे, १०१७), संभाजीनगर (१०५७), चिंचवड (११०९), संभाजीनगर (१०४५), हिंगोली (१०२०), धायरी (पुणे, १२२१) व श्री क्षेत्र औंढा नागनाथ (९१८) येथे पारायणेसंपन्न झाली आहेत. या पारायणात वाचन सेवा निःशुल्क असून वाचकास ग्रंथ प्रसाद रुपात देण्यात येणार आहे. शिवाय दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पारायण सोहळ्यात सकाळी ६ ते ७ नित्यपूजा, ७.३० ते १० राजोपचार लघुरुद्र,महाअभिषेक, सेवनांद संगीत सभा, सकाळी १० ते १२ श्री गुरुचरित्र सारामृत पारायण, दुपारी तीन ते साडेसहा गुरुचरित्र कथामृत होणार आहे. तसेच दररोज नित्यनेमाने भिक्षा, नैवेद्य, आरती, महाप्रसाद होईल. सोहळा यशस्वीतेसाठी शंभरहूनअधिक सेवेकरी परिश्रम घेत आहेत.

या पारायण सोहळ्यात सहभागी होण्यासाठी ९८३४४४५३७५, ९७६३२९२१७१ या क्रमांकावर संपर्क साधून जास्तीत जास्त वाचकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मकरंद महाराज, निखिल लातूरकर यांनी केले आहे. यावेळी मिलिंद साकळकर, सुरेंद्र जोशी, मधुकर रत्नपारखी, शंतनू पांडे, दीपक बेलापूरकर, शेखर लांडगे आदींची उपस्थिती होती.

# छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरात प्रमाणपत्रांचे वितरण



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)**– कुंडलवाडी येथे शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अंतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

यावेळी विभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे, नायक तहसीलदार रघुनाथ सिंह चव्हाण, मंडळ अधिकारी आंबेराय, ग्राम महसूल अधिकारी पवन ठाकरोड, बी. जे. कांबळे, विशाखा रायबोले, श्रीमती अन्नमवार, कोतवाल तुंगेनवार, भोरे, सायलू गणरोड, सायलू बंटावाड, शंकर किशोर आदी उपस्थित होते.

# कंधारच्या मनोविकास विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

**कंधार (प्रतिनिधी)**– येथील मनोविकास माध्यमिक विद्यालयाचा एस.एस.सी. परीक्षेचा ९५.६०% निकाल लागला आहे. १८२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.

कु सावळे हर्षदा रानबा ९६.४०%, कु. रोडगे संस्कृती अरविंद. ९५.८०%, कु.मामडे प्रेरना चंद्रकांत–९५.६०%, सुवर्णकार सोहम संजीवकुमार–९३.२०%, अंसारी सोफीया तांजिम कलिम हसन–९०.२०% यांनी विशेष प्राविण्य श्रेणी मिळविली आहे. एस.एस.सी. परीक्षेत एकुण १८२ विद्यार्थ्यांपैकी ५७ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष पुलकुंडवार, सचिव परमेश्वर बोड्डावार, मुख्याध्यापिका श्रीमती विद्या सरनाईक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# पारडी येथे आखाड्यावरील कडब्याच्या गंजीला आग



**लोहा (प्रतिनिधी)**– तालुक्यातील पारडी येथील शेतकरी भगवान पवार यांच्या आखाड्यावर शुक्रवारी अचानक आग लागली. या आगीत कडबा, सोयाबीनची गुळी व गवताची गंजी अशी अंदाजे जवळपास अंदाजे ३० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, दि. १६ मे रोजी दुपारी दोन वाजता पारडी येथील भगवान पांडुरंग पवार यांच्या आखाड्या लगत शेतातील शेजाऱ्याने गव्हाच्या गुळीला आग लावून दिली. या आगीने जवळील कडब्याच्या गंजीला लागून रौद्र रूप धारण केले. त्यानंतर अग्निशामक दलास १०१ क्रमांकावर संपर्क केला असता वेळीच प्रतिसाद मिळाला नाही. मात्र प्रसंगावधान दाखवून उपविभागीय अधिकारी अरूणा संगेवार यांनी कंधार न.पा.च्या अग्निशामक दलाच्या गाडीस घटना स्थळी पाचारण केले. त्यानंतर आग आटोक्यात आली. मात्र तोपर्यंत कडब्याची गंजी, गवताची गंजी व गुळी जळून खाक झाली. यात जवळपास अंदाजे २५ ते ३० हजारांचे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात आले. सुनेगावचे तलाठी परशुराम जाधव यांनी पंचनामा केला आहे.

# आरटीएसई बुद्धीमत्ता चाचणी स्पर्धेत जिनियस किडस् स्कूलची अदिती जाधव महाराष्ट्रात अव्वल

**माहूर (प्रतिनिधी)**– जिनियस किडस् इंटरनॅशनल स्कूल मधील इयत्ता दुसऱ्या वर्गातील विद्यार्थीनी कु. अदिती ज्ञानेश्वर जाधव हिने आरटीएसई स्पर्धा २०२५ मध्ये महाराष्ट्रातून प्रथम आली आहे.

माहूर येथील जिनियस किड्स इंटरनॅशनल स्कूलचे विद्यार्थी स्कॉलरशिप, नवोदय तसेच प्रज्ञाशोध परीक्षा व वेगवेगळ्या स्पर्धेत सतत आपला ठसा उमटवत आहेत. त्यातच आता आरटीएसई या बुद्धीमत्ता चाचणी स्पर्धेतील कु.अदिती ज्ञानेश्वर जाधव या इयत्ता दुसरीतील विद्यार्थीनीकडून अधिक लकाकी मिळाली आहे.

या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष भाग्यवान भवरे यांनी तिचे, मार्गदर्शक शिक्षकांचे व अदितीच्या पालकांचे विशेष अभिनंदन केले आहे. या यशाबद्दल राज्याचे स्वच्छता दूत राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद माहुर तालुकाध्यक्ष एस.एस.पाटील, रमेश मुनेश्वर, डॉ. अरुण नखाते, मिलिंद कंधारे, सुधीर जाधव, विजय घाटे, रंजीत वर्मा, मुख्याध्यापक संजीव वाठोरे, राजू मार्गमवार परिसरातील शिक्षण प्रेमींकडून तिचे कौतुक केले जात आहे.

# पंचशील विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**हदगाव (प्रतिनिधी)**– शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ संचलित पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयात इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेचे सचिव सुनील सोनुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला.

हदगाव–हिमायतनगर दोन्ही तालुक्यातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत कु.अंजली गायकवाड या विद्यार्थिनीने ९७.६० टक्के गुण मिळविले. याबद्दल तिच्यासह आई–वडिलाचा सुनील सोनुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कोणतीच शिकवणी न लावता केवळ शाळेत उपस्थित राहून आपण केलेल्या अभ्यासामुळे व शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आपल्याला हे यश मिळाल्याचे सांगितले.

कु. अंजली गायकवाड, कु. शाश्वती शिंदे, लक्ष्मीकांत नरवाडे, समर्थ वटाणे, अभिजीत चव्हाण, कु. गायत्री वानखेडे, समर्थ पवार, शंभू तावडे यांनी ९० टक्क्यांच्यावर तर कु.निकिता भालेराव, कु साक्षी तावडे, कु.श्रीदेवी मुंडे, कु.संचिता गुदाल, कु. नंदिनी खंदारे या विद्यार्थ्यांनी ८९च्यावर गुण पटकावले. यानिमित्त विद्यार्थ्यांसह पालकांचाही शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास संस्थेचे संचालक जगदीश कदम, सामाजिक कार्यकर्ते बशीरभाई, शाळेचे मुख्याध्यापक बंडेवार इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक श्रीमती चंदापुरे, पतंगे, नरवाडे, काळबांडे, देशमुख यांच्यासह सर्व विषय शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

येत्या १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनी गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख अनिल दस्तूरकर यांनी केले.

# पैनगंगा मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर तावडे यांना कॅलिफोर्निया विद्यापीठाची पीएच. डी प्रदान




**नांदेड (प्रतिनिधी)**– सामाजिक आणि उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीयकार्याबद्दल अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने सामाजिक कार्यकर्ते तथा पैनगंगा मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष डॉ. कमलकिशोर तावडे पीएच.डी प्रदवी प्रदाने केली आहे.

डॉ. कमलकिशोर तावडे यांनी सामाजिक भान ठेवत खेड्यापाड्यातील छोटेमोठे उद्योग, शेतकरी समूह, बचत गट, सुशिक्षित बेरोजगारांना,कुटीर उद्योगांना, अर्थसहाय्य करत स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली. दरम्यान त्यांच्या या कामाची दखल समता प्रतिष्ठान दिल्लीने घेतली. त्यानुसार त्यांना सामाजिक क्षेत्रात, सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल आयकॉन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर उद्योग आणि सहकार क्षेत्रातील उत्कृत योगदाना बद्दल अमेरिकेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाची पीएचडी पदवी त्यांना बहाल करण्यात आली. दि. ११ मे रोजी नवी दिल्लीत अशोकस्तंभाचे सन्मान चिन्ह आणि पीएच.डी पदवी देण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद हायस्कूल अर्धापूरच्या १९९१ च्या तुकडीतील वर्गमित्रांचा गेटटुगेदर सोहळा रंगला

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या १९९१ दहावी तुकडीच्या माजी विद्यार्थ्यांचा गेट टुगेदर सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तब्बल ३५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या ७५ मित्रांनी मैत्रीचा आनंद लुटला.




गेल्या तीन दशकांहून अधिक काळानंतर भेटलेल्या मित्रांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाची सुरूवात दिवंगत गुरुवर्य आणि निधन झालेल्या मित्रांच्या श्रद्धांजलीने झाली. उपस्थितांनी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली. मैत्रीची हीच तर गंमत आहे, जवळ नसतानाही हृदयातली सलगता आहे. वर्षानुवर्षे न भेटल्यावरही, पहिल्या भेटीसारखी तीच गोडी आहे.

कार्यक्रमात सर्व मित्रांनी आपला कौटुंबिक आणि व्यावसायिक प्रवास उलगडला. प्रत्येकाच्या यशोगाथा ऐकून सर्वांनाच आनंद झाला. जुन्या आठवणींना उजाळा देत, काही क्षणांसाठी शाळेचे दिवस पुन्हा जिवंत झाले.

कधीही न संपणारी ही मैत्रीची गाठ, शाळेतील आठवणींना दिली पुन्हा वाट. वाटलं कधी हरवली ती मित्रांची साथ, पण भेटल्यावर कळलं, आहे तीच ती गाठ. गेट टुगेदरचे आयोजन अतिशय मनमोहक होते.

एकमेकांच्या सहवासात वेळ कसा गेला हे कळलेच नाही. शेवटी रुचकर जेवणाचा आस्वाद घेत मैत्रीचा हा सोहळा समारोपाकडे गेला. उपस्थितांनी पुन्हा एकत्र येण्याचा निर्धार केला आणि आनंदाच्या आठवणी घेऊन परतले.


# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या...

# ५ ॲप्स तुमच्या मुलांच्या सुट्ट्या करतील संस्मरणीय



**मुलांचा स्क्रीन टाइम कमीत कमी ठेवला पाहिजे यात काही शंका नाही. आता उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू झाल्याने मुले फोन किंवा टॅब्लेटसारख्या उपकरणांना अक्षरशः चिकटून बसले आहेत. अशा परिस्थितीत, तो वेळ स्मार्ट स्क्रीन टाइम का बनवू नये ? असे अनेक ॲप्स आहेत ज्यांच्या मदतीने तुम्ही तुमच्या मुलांना मित्र बनवले तर त्यांना मजा येईल आणि खेळताना खूप काही शिकायला मिळेल. आज आम्ही तुम्हाला अशाच ५ ॲप्सबद्दल सांगणार आहोत. तुम्ही हे ॲप्स वापरून पाहू शकता. वेगवेगळ्या वयोगटातील मुलांसाठी खास डिझाइन केलेले हे ॲप्स तुमच्या मुलांच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या संस्मरणीय बनवतील...**



## हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी...

आता आपण तुम्हाला अशा ॲप्सबद्दल सांगूया जे आजकाल जीवशास्त्र आणि कॅल्क्युलसचा अभ्यास सुरू केलेल्या मुलांसाठी खूप उपयुक्त ठरतील. तुम्ही या ॲप्सचा डिजिटल ट्यूटर म्हणूनही विचार करू शकता, जे तुम्हाला कोणत्याही समस्येचे टप्प्याटप्प्याने निराकरण करायला शिकवतील. यापैकी, Photomath, kahoot Qj आणि mimo सारखे ॲप्स लोकप्रिय आहेत. जर तुमच्या मुलाला कोडिंग शिकण्यात रस असेल, तरीही त्यांना हे ॲप्स खूप मजेदार वाटतील. याशिवाय, गणिताचे कठीण प्रश्न असोत किंवा सामान्य ज्ञानाचे प्रश्नमंजुषा असोत, सर्व काही एकाच ठिकाणी अतिशय रंगीत पद्धतीने उपलब्ध असेल.

- युट्यूब किड्स : जर तुमच्या घरात लहान मुले असतील आणि त्यांना व्हिडिओ पाहण्याची इच्छा असेल तर त्यांना YouTube ऐवजी YouTube Kids दाखवा. या ॲपचा एक फायदा असा आहे की या ॲपवर तुमच्या मुलाला असे काहीही दिसणार नाही जे त्याने पाहू नये. तसेच, YouTube Kids मधील सामग्री मुलांसाठी परिपूर्ण आहे. या ॲपवर तुम्हाला अशा अनेक कथा सापडतील ज्या तुमची मुले खूप आवडीने ऐकतील. जर तुमच्या मुलांना कवितांमध्ये रस असेल तर त्यांना येथे अनेक यमकदेखील मिळतील. एकंदरीत, हे ॲप तुमच्या मुलाची व्हिडिओ पाहण्याची इच्छा जबाबदारीने पूर्ण करेल.
- ३ ते ५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी : जर तुमच्या मुलाचे वय ३ ते ७ वर्षांच्या दरम्यान असेल, तर तुम्ही Khan Academy Kids, Bimi Boo Preschool Learning Games, Kids Games for toddlers हे ॲप्स त्यांना वापरायला देऊ शकतात. या ॲप्सचे वैशिष्ट्य म्हणजे हे ॲप्स सर्व प्रकारच्या जाहिरातींपासून मुक्त आहेत. अशा परिस्थितीत, तुमच्या मुलाला शुद्ध खेळ किंवा धडे मिळतील ज्यातून तो काहीतरी शिकू शकेल. याशिवाय, हे ॲप्स इंग्रजी व्यतिरिक्त स्थानिक भारतीय भाषांतदेखील उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत, तुमच्या मुलाला त्यांच्याशी संवाद साधण्यात कोणतीही अडचण येणार नाही. तुमच्या मुलाला ज्या गोष्टींमध्ये रस असेल, त्या त्याला या ॲप्सवर सापडतील जसे की कविता, कथा, जुळणी सराव, मोजणी आदी.



- ६ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी : आता आपण शिकायला सुरुवात केलेल्या मुलांबद्दल बोलूया. ज्यांच्या मनात प्रत्येक गोष्टीबद्दल इतके प्रश्न आहेत की कदाचित एआय देखील हार मानेल. तथापि, या मुलांचे लक्ष विचलित करण्यासाठी तुम्ही ANTON, Smart Tales आणि Fiete Math Climber सारखे ॲप्स वापरून पाहू शकता. हे ॲप्स iOS, Android आणि PC ब्राउझरवर देखील चालू शकतात. मुलांमध्ये शिकण्याची इच्छा वाढावी म्हणून हे ॲप्स विशेषतः अशा प्रकारे डिझाइन केले आहेत. हे सर्व ॲप्स मोफत आणि जाहिरातींपासून मुक्त आहेत. यापैकी अनेक ॲप्सना गुगल प्ले स्टोअरवर शिक्षकांनी योग्य मान्यता दिली आहे.
- ९ ते ११ वर्षे वयोगटातील मुलांसाठी : या वयातील मुलांसाठी असे खास ॲप्स उपलब्ध आहेत जे वेगवेगळ्या विषयांचे विषय कंटाळवाणे न वाटता मजेदार वाटतील.Quick Maths, Droplets, May the forces with you ही अशी काही ॲप्स आहेत. ते गणित, भौतिकशास्त्र आणि भाषेवर लक्ष केंद्रित करते. तुमच्या मुलाला ज्या विषयात रस कमी असेल, त्या विषयात ही ॲप्स त्याची आवड वाढवू शकतात. तसेच, या ॲप्सशी संवाद साधताना, तुमच्या मुलाला कधीही असे वाटणार नाही की तो अभ्यास करत आहे, उलट सर्वकाही खेळकर पद्धतीने घडेल आणि खूप मजेदार वाटेल. हे ॲप्स मुलांची गणित, भौतिकशास्त्र आणि भाषेत रस मोठ्या प्रमाणात वाढवू शकतात.

# मृत व्यक्तीचे आधार, पॅन कार्ड कसे बंद करावे?



**एखादी व्यक्ती जिवंत असताना, त्याच्याकडे आधार कार्ड, पॅन कार्ड सारखी अनेक कागदपत्रे असतात, जी दैनंदिन कागदपत्रांमध्ये वापरली जातात. जेव्हा एखाद्याचा मृत्यू होतो तेव्हा कुटुंबातील सदस्य बहुतेकदा त्याचे आधार, पॅन आणि इतर कागदपत्रे सुरक्षितपणे ठेवतात. पण जबाबदारी इथेच संपत नाही. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर किमान त्याचे आधार आणि पॅन कार्ड रद्द करावेत, कारण त्याचा गैरवापर होण्याचा धोका असतो, असे तज्ञांचे म्हणणे आहे. गुन्हेगार अनेकदा फसवणूक आणि आर्थिक व्यवहार करण्यासाठी अशी कागदपत्रे मिळवू शकतात. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर, त्याचे पॅन आणि आधार ऑनलाइन रद्द केले जाऊ शकतात. कसे ते जाणून घेऊया...**

कोणतेही पॅन कार्ड त्याच्या अधिकृत समाप्ती तारखेपर्यंत वैध राहते. जर एखाद्याचा अचानक मृत्यू झाला तर त्याचे पॅन कार्ड रद्द करावे. जर हे केले नाही तर कोणीतरी त्या पॅन कार्डवर खाते उघडू शकते आणि बेकायदेशीर पद्धतीने कर्ज घेऊ शकते. पॅन कार्ड रद्द करण्यासाठी ऑफलाइन आणि ऑनलाइन दोन्ही पद्धती आहेत. ऑफलाइन पद्धतीने, अर्ज भरावा लागेल. या पत्रात मृत व्यक्तीचे पूर्ण नाव, मृत्यूची तारीख, पॅन कार्ड रद्द करण्याचे कारण आणि पॅन कार्ड रद्द करणाऱ्या व्यक्तीची माहिती जसे की मृत व्यक्तीचा मुलगा किंवा पत्नी यांचा समावेश आहे. यासोबतच मृत्यू प्रमाणपत्र इत्यादी काही कागदपत्रे जोडावी लागतील. तो अर्ज आयकर विभागातील एओ कडे सादर केला जातो. आयकर ई-फायलिंग पोर्टलवरून एओ तपशील उपलब्ध आहेत.

## आधार कार्ड कसे रद्द करावे ?

- वृत्तानुसार, आधार कार्ड रद्द करण्याचा सध्या कोणताही पर्याय उपलब्ध नाही. पण तुम्ही मृत व्यक्तीचा बायोमेट्रिक डेटा लॉक करू शकता.
- बायोमेट्रिक डेटा लॉक केल्यामुळे, मृत व्यक्तीच्या बोटांचे ठसे, आयरीस स्कॅन इत्यादींमध्ये छेडछाड करता येत नाही. बायोमेट्रिक डेटा लॉक करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे एसएमएस.
- मृत व्यक्तीच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून १९४७ वर एसएमएस पाठवावा लागेल. तुम्हाला त्यात GETOTP टाइप करावे लागेल आणि स्पेस दिल्यानंतर, तुम्हाला आधार क्रमांकाचे शेवटचे ४ अंक लिहावे लागतील.
- OTP मिळाल्यानंतर, या स्वरूपात दुसरा एसएमएस पाठवा - LOCKUID ‹ आधारचे शेवटचे ४ अंक» ‹६ अंकी OTP»
- तुम्ही हे काम UIDAI वेबसाइटवर देखील करू शकता. वेबसाइटवर जा आणि लॉग इन करा. माय आधार सेक्शनमध्ये जा आणि लॉक/अनलॉक बायोमेट्रिक्स निवडा. तिथे पुन्हा आधार क्रमांक टाका आणि OTP वापरून पडताळणी करा. शेवटी लॉक बायोमेट्रिक्स वर क्लिक करा.

## एनएसडीएल वेबसाइटला भेट द्या...

जर तुम्हाला हे काम ऑनलाइन करायचे असेल, तर तुम्हाला फॉर्म ४९अ भरावा लागेल, जो एनएसडीएल वेबसाइटवर उपलब्ध असेल. तिथे, तुम्हाला पॅन दुरुस्ती अर्ज पर्यायावर जावे लागेल आणि पॅन रद्द करण्याची विनंती करावी लागेल. त्यानंतर, सर्व कागदपत्रे जवळच्या एनएसडीएल पॅन सेवा केंद्रात सादर करावी लागतील.

## हे करणे का आवश्यक आहे ?

अलिकडच्या काळात ऑनलाइन फसवणुकीचे प्रमाण खूप वाढले आहे. सायबर गुन्हे कधी आणि कोणासोबत घडू शकतात हे कोणालाही माहिती नाही. जर एखाद्या मृत व्यक्तीच्या आधार-पॅनमध्ये काही फसवणूक झाली तर त्याच्या कुटुंबाला परिस्थिती हाताळणे खूप कठीण होईल. अशा परिस्थितीत, हे दस्तऐवज वेळेत रद्द करून त्यांचे संरक्षण करणे महत्वाचे आहे.

# तुमच्या हातातून कोणी मोबाईल हिसकावून घेतला?

**एक काळ असा होता जेव्हा चेन स्नॅचिंगच्या घटना खूप वाढल्या होत्या. आता साखळीची जागा मोबाईल फोनने घेतली आहे. खरं तर, चोरीच्या घटनांमुळे लोकांनी सोन्याचे दागिने घालून बाहेर जाणे बंद केले आहे, परंतु कोणीही त्यांचा फोन घरी सोडून कुठेही जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत, जर कोणी तुमच्या हातातून फोन हिसकावून पळून गेला, तर तुम्हाला माहित असले पाहिजे की कोणत्या ५ गोष्टी आधी कराव्यात...**

- प्रथम सिम ब्लॉक करा : जर कोणी तुमचा फोन हिसकावून पळून गेला तर सर्वप्रथम तुम्ही तुमचे सिम ब्लॉक केले पाहिजे. यासाठी, तुम्ही टेलिकॉम ऑपरेटरच्या ऑफलाइन स्टोअरमध्ये जाऊ शकता किंवा जर तुमच्या घरात कोणीतरी त्याच कंपनीचे सिम वापरत असेल, तर तुम्ही त्यांच्या फोनवरून कस्टमर केअरशी बोलून तुमचे सिम ब्लॉक करू शकता. पोलीस अधिकारी असे सांगतात, की जर फोन हिसकावून घेतला गेला तर प्रथम सिम ब्लॉक करावा. कारण फोन चोरणारी व्यक्ती तुमच्या नंबरवर OTP विचारून तुमचे बँक खाते रिकामे करू शकते. जर तुमचे सिम ब्लॉक झाले तर तुम्हाला आणखी आर्थिक नुकसान होणार नाही.
- स्थान ट्रॅक करा : जर तुम्ही आयफोन वापरकर्ता असाल, तर तुम्ही तुमच्या पीसीवर फाइंड माय वापरून तुमच्या फोनचे लोकेशन ट्रॅक करू शकता. हे तुम्हाला तुमचा फोन शोधण्यात मदत करू शकते. त्याचप्रमाणे, अँड्रॉइड वापरकर्ते गुगल फाइंड मायच्या मदतीने त्यांच्या डिव्हाइसचे स्थान शोधू शकतात. ही सेवा सॅमसंग डिव्हाइसवर सॅमसंग फाइंड नावाच्या ॲपद्वारे उपलब्ध होऊ शकते.
- सर्व महत्त्वाचे पासवर्ड बदला : जेव्हा कोणी अचानक तुमचा फोन हिसकावून पळून



जातो, तेव्हा क्षणभर तुम्हाला पुढे काय करावे हे समजत नाही. जर तुमच्यासोबत अशी परिस्थिती उद्भवली तर तुम्ही तुमच्या सर्वात महत्त्वाच्या खात्यांचे पासवर्ड बदलले पाहिजेत. यामध्ये बँकिंग ॲप्सचे पासवर्डदेखील समाविष्ट करा. असे केल्याने, तुम्ही स्वतःला पुढील नुकसानीपासून वाचवू शकता. खरं तर, आपली जवळजवळ सर्व महत्त्वाची खाती आपल्या स्मार्टफोनमध्ये लॉग इन केलेली असतात. अशा परिस्थितीत, जर तुम्ही या अकाउंट्सचे पासवर्ड बदलले तर फोन चोरणारी व्यक्ती तुम्हाला आणखी नुकसान करू शकणार नाही.
- हरवलेला फोन नोंदवा : फोन चोरीला गेल्यास, वर नमूद केलेल्या आवश्यक पायऱ्या पूर्ण केल्यानंतर, हरवलेल्या फोनबद्दल पोलिसांकडे तक्रार दाखल करावी. तुम्ही हे काम ऑनलाइन देखील करू शकता. यासाठी तुम्हाला पोलिसांच्या वेबसाइटला भेट द्यावी लागेल. महाराष्ट्र राज्य पोलिसांची वेबसाईट https://citizen.mahapolice.gov.in/Citizen/MH/MobileMissingForm.aspx अशी आहे. याच्या मदतीने तुम्ही तुमच्या हरवलेल्या फोनबद्दल पोलिसांकडे सहजपणे तक्रार दाखल करू शकाल.

# ऑनलाइन ई-पासपोर्ट कसा मिळवायचा, ६ स्टेप्समध्ये अर्ज करू शकता

**परदेशात जाणाऱ्यांसाठी सरकारने ई-पासपोर्टची अंमलबजावणी सुरू केली आहे. असा दावा केला जात आहे की प्रवाशाची माहिती डिजिटल पद्धतीने जतन केली जाईल आणि ओळखपत्र पडताळणी स्वयंचलितपणे केली जाईल. देशातील सर्व पासपोर्ट कार्यालये ई-पासपोर्ट जारी करत आहेत. यामध्ये नागपूर, भुवनेश्वर, जम्मू, गोवा, शिमला, रायपूर, अमृतसर, जयपूर, चेन्नई, हैदराबाद, सुरत आणि रांची येथील पासपोर्ट कार्यालयांचा समावेश आहे. जर तुम्हालाही ई-पासपोर्ट बनवायचा असेल तर ही प्रक्रिया ऑनलाइन करता येते. तुम्ही ऑनलाइन अर्ज करू शकता. आम्ही तुम्हाला याची पद्धत सांगत आहोत.**



## ई-पासपोर्ट म्हणजे काय ?

ई-पासपोर्ट हा सामान्य पासपोर्टसारखाच असतो. रिपोर्ट्सनुसार, त्यात काही डिजिटल फीचर्स जोडण्यात आले आहेत. ई-पासपोर्टमध्ये एक चिप बसवलेली असते, ज्याला आरएफआयडी (रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन) म्हणतात. ही चिप पासपोर्ट कव्हरच्या आत असते. यामध्ये व्यक्तीची वैयक्तिक माहिती जतन केली जाते. ई-पासपोर्ट ओळखण्यासाठी, त्यावर पिवळा चिन्ह असतो. असा दावा केला जातो की चिपमध्ये असलेला डेटा PKI नावाच्या प्रणालीमध्ये सुरक्षित ठेवला जातो, जेणेकरून कोणीही बायोमेट्रिक तपशील चोरू शकणार नाही. जर RFID असलेल्या ई-पासपोर्टचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला तर भविष्यात बनावट पासपोर्ट बनवणे अशक्य होईल.




## ई-पासपोर्टचे तीन मोठे फायदे

1 सरकारचे म्हणणे आहे की ई-पासपोर्टमुळे प्रवास पूर्वीपेक्षा अधिक सोयीस्कर होईल. पासपोर्ट बनवताना होणारी फसवणूक कमी होईल. ई-पासपोर्ट धारकांना विमानतळावर कमी वाट पहावी लागेल.

2 पासपोर्टमधील चिपद्वारे त्वरित पडताळणी केली जाईल. त्यात साठवलेला डेटा कोणीही चोरू शकणार नाही. कारण तो पूर्णपणे वेगळ्या सिस्टीममध्ये सेव्ह केला जाईल.

3 सध्या परदेशात जाणाऱ्यांना ई-पासपोर्टचा लाभ मिळेल. भविष्यात हा पासपोर्ट सामान्य पासपोर्ट म्हणून वापरला जाण्याची शक्यता आहे.

## ई-पासपोर्ट ऑनलाइन कसा बनवायचा

- पायरी १ : ई-पासपोर्ट ऑनलाइन मिळविण्यासाठी, तुम्हाला पासपोर्ट सेवेच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करावी लागेल.
- पायरी २ : नोंदणी केल्यानंतर, तुमच्या आयडीने लॉग इन करा.
- पायरी ३ : तुम्हाला 'नवीन पासपोर्टसाठी अर्ज करा/पासपोर्ट पुन्हा जारी करा' हा पर्याय दिसेल, त्यावर क्लिक करा.
- पायरी ४ : जर तुम्ही पहिल्यांदाच अर्ज करत असाल तर नवीन पर्याय निवडा. जर तुमच्याकडे आधीच पासपोर्ट असेल आणि तो ई-पासपोर्टमध्ये रूपांतरित करायचा असेल तर 'पुन्हा जारी करा' पर्याय निवडा.
- पायरी ५ : तपशील प्रविष्ट केल्यानंतर, तुम्हाला ऑनलाइन शुल्क भरावे लागेल, ज्यामुळे तुमची अपॉइंटमेंट बुक होईल. अर्ज पावती जतन करा.
- चरण ६ : यानंतर, तुम्हाला नियोजित तारखेला तुमच्या कागदपत्रांसह PSK किंवा RPO ला जावे लागेल.
- सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ई-पासपोर्ट तुमच्या पत्त्यावर पाठवला जाईल.



# धावत्या बसला लागलेल्या आगीत पाचजण मृत्यूमुखी

## चालक आणि कंडक्टरचे बस सोडून पलायन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – धावत्या वातानुकुलीत बसमध्ये लागलेल्या भीषण आगीनंतर पाच प्रवाशांचा जिवंत जळून मृत्यू झाला. मृतांमध्ये आई-मुलगी, भाऊ-बहीण आणि एका तरुणाचा समावेश आहे. बसमध्ये सुमारे ८० प्रवासी होते. स्लीपर बस बिहारमधील बेगुसरायहून दिल्लीला जात होती. हा अपघात लखनौमध्ये पहाटे ४ वाजून ४० मिनिटांनी आउटर रिंग रोड, किसान पथवरील मोहनलालगंजजवळ घडला. त्यावेळी बहुतेक प्रवासी झोपले होते.



प्रत्यक्षदर्शींच्या मते, मृतदेह इतके जळाले होते की त्यांची ओळख पटवणे कठीण झाले होते. दोन मुलांचे मृतदेह सीटवर होते, तर दोन महिला आणि एका तरुणाचे मृतदेह सीटच्या मध्यभागी पडले होते. लॉकेट आणि अंगठ्यांवरून मुलांची ओळख पटवण्यात आली. पोलिसांच्या प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की धावत्या बसला शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. आपत्कालीन गेट उघडला नाही. त्यामुळे मागे बसलेले लोक अडकले. बसमध्ये प्रत्येकी पाच किलोचे सात गॅस सिलिंडर होते. तथापि, एकही सिलिंडर फुटला नाही.

**चालक व कंडक्टरचे बस सोडून पलायन**

यानंतर बसमध्ये चेंगराचेंगरी झाली. चालक आणि कंडक्टर बस सोडून पळून गेले. चालकाच्या सीटजवळ एक अतिरिक्त सीट बसवण्यात आली. अशा परिस्थितीत प्रवाशांना खाली उतरण्यास त्रास झाला. अनेक प्रवासी अडकले आणि पडले. जवळच्या लोकांनी पोलिसांना आणि अग्निशमन दलाला माहिती दिली. अग्निशमन दलाच्या गाड्या पोहोचल्या तोपर्यंत संपूर्ण बस जळाली होती. अग्निशमन दलाने सुमारे ३० मिनिटांत आग विझवली. पथक आत पोहोचले तेव्हा ५ जळालेले मृतदेह आढळले. प्रवासी राम बालक महातो यांनी मोहनलालगंज पोलिस ठाण्यात बस मालक, चालक आणि क्लीनरविरुद्ध तक्रार दाखल केली. राम बालक यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे निरीक्षक दिनेश कुमार सिंह यांनी सांगितले.

अपघातात आपला मुलगा आणि मुलगी गमावलेले राम बालक महातो म्हणाले की, मी माझ्या सात महिन्यांच्या गर्भवती पत्नी आणि दोन मुलांसह बसमध्ये प्रवास करत होतो. आग लागली तेव्हा मी प्रथम माझ्या पत्नीला खाली उतरवले. मुले सीटवर झोपली होती. मी त्यांना खाली उतरवू शकलो नाही. माझा मुलगा आणि मुलगी माझ्यासमोर जळाली. मी बाहेर ओरडत आणि धडपडत राहिलो, पण आग इतकी तीव्र होती की मी काहीही करू शकलो नाही. अपघातात पत्नी आणि मुलगी गमावलेले अशोक महातो म्हणाले की, अपघाताच्या वेळी मी झोपलो होतो. आवाज ऐकून मी जागा झालो. तोपर्यंत बस धुराने भरली होती. बसमध्ये एक लोखंडी रॉड ठेवण्यात आला होता. मी त्या काचा फोडल्या आणि माझ्या मुलासह बाहेर उडी मारली. माझी पत्नी आणि मुलगी बसमध्ये अडकली. दोघेही बाहेर पडण्यासाठी ओरडत राहिले, पण मी त्यांना वाचवू शकलो नाही. दुपारी १२.३० वाजता बिहारमधील बेगुसराय येथून बस (युपी १७ टी ६३७२) दिल्लीला निघाली. मध्यरात्री १२ वाजता गोरखपूरमध्ये आणखी काही प्रवासी बसले होते. गुरुवारी पहाटे ४.४० वाजता बस लखनऊ आऊटर रिंग रोडवरील काटे भिट गावाजवळ पोहोचली तेव्हा तिला आग लागली. त्यावेळी बसचा वेग ताशी ८० ते १०० किमी असल्याचे सांगितले जाते. बसमधील एका प्रवासी अनुज सिंग यांनी सांगितले की, बसच्या इंजिनमध्ये स्पार्किंगमुळे आग लागली. अपघाताच्या वेळी बहुतेक प्रवासी झोपले होते. आग लागल्यानंतर बसमध्ये खूप आरडाओरडा झाला. हे पाहून चालक आणि कंडक्टरने उडी मारली आणि पळून गेले. बसमध्ये पडदे होते. त्यामुळे आग वेगाने पसरली.

# खेलो इंडिया युवा स्पर्धेत महाराष्ट्राची विजेतेपदाची हॅट्ट्रीक

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून खेळाडूंचे अभिनंदन

**मुंबई (प्रतिनिधी)** – 'भले शाब्बास!, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपण सर्वांनी महाराष्ट्राच्या क्रीडा गौरवात आणखी भरच घातली आहे. या यशामुळे आपण सर्व खेळाडू महाराष्ट्राचा अभिमान आहात,' अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेलो इंडिया युवा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदाची हॅट्ट्रीकाचा पराक्रम साधणाऱ्या महाराष्ट्राच्या चमुतील खेळाडुंचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी करीत ५८ सुवर्ण, ४७ रौप्य, ५३ कांस्य अशी एकूण १५८ पदकांची लयलूट केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी अत्यंत आनंद झाल्याचे नमूद केले आहे. तसेच या ७ व्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राने तब्बल ९ स्पर्धा विक्रमांचा पराक्रमही नोंदविणे अभिमानास्पद असल्याचे म्हटले आहे.

ग्रामीण भागांतून येणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्यासाठीची प्रेरणा मिळावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'खेलो इंडिया स्पर्धा' २०१८ पासून सुरू झाली.

या स्पर्धेत आतापर्यंत महाराष्ट्राने पाचव्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरणे ही बाब आपल्या ग्रामीण भागातील खेळाडूंच्या गुणवत्तेची चुणूक दाखवणारी आहे. या स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, मार्गदर्शक आणि खेळाडूंच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिलेल्या त्यांच्या कुटुंबीयांचे देखील कौतुक करावे तितके थोडेच आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. तसेच या सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जवान लक्ष्मण पवार यांच्यावर अंत्यसंस्कार

**सोलापूर (प्रतिनिधी)**– भारतीय सैन्य दलात पश्चिम बंगाल राज्यातील बागडोगरा येथे कर्तव्यावर असताना मृत्यू पावलेले जवान लक्ष्मण संजय पवार यांच्या पार्थिवावर शुक्रवारी १६ मे रोजी गिरझणी येथील मूळग गावात अंत्यसंस्कार करण्यात आले. गावातील स्मशानभूमीत शासकीय इतमामात हजारोंच्या उपस्थितीत त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी, जवान लक्ष्मण पवार अमर रहे.. भारत माता की जय... वंदे मातरमच्या घोषणांनी स्मशानभूमी परीसर दुमदुमून गेला होता. तर, जो शहीद हुए है उनकी, जरा याद करो कुर्बाणी हे गीत अंत्यसंस्कार मिरवणुकीत अनेकांच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या.

## १० एकर जमीन हडपण्यासाठी केला घोटाळा; वरिष्ठ पोलीस निरीक्षकांवर गुन्हा दाखल

**पुणे (प्रतिनिधी)** पुण्यातील कुख्यात गुंड गजा मारणेसोबत मटण पार्टी केल्यामुळं पोलिसांवर कारवाई केल्याचं प्रकरण ताजं असतानाच आता जमिनीच्या वादात आर्थिक फायद्यासाठी पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी पुणे पोलिस दलातील वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चंदननगर पोलिस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र लांडगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र लांडगे यांच्यासह चार जणांच्या विरुद्ध चंदननगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यातील वाघोली येथील १० एकर जमिन हडपण्याचे उद्देशाने संगनमत करून फौजदारीपात्र रचून स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता बनावट महिला उभी करून ती मूळ जमिनीची मालक असल्याच्या भासविण्यात आल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

पुण्यातील एका बड्या बांधकाम व्यवसायाशी देखील हे प्रकरण संबंधित असल्याचे बोलले जाते आहे. आनंद लालासाहेब भगत, शैलेश सदाशिव ठोंबरे, राजेंद्र लांडगे, अपर्णा यशपाल वर्मा अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. चंदननगर पोलिसांचे एक तपास पथक आता या गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत आहे. वाघोली येथील १० एकर जमिन हडपण्याच्या उद्देशाने संगनमत करून फौजदारीपात्र रचून स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता बनावट महिला उभी करून ती मूळ जमिनीची मालक असल्याच्या भासवण्यात आल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

## सीआरपीएफच्या श्वानाचा मृत्यू

**छत्तीसगड (प्रतिनिधी)**– छत्तीसगडच्या करेगुट्टा हिल्स भागात नक्षलविरोधी मोहिमेदरम्यान सीआरपीएफचा प्रशिक्षित श्वान के ९ रोलो शहीद झाला. त्याच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

छत्तीसगडमधील बिजापूरमध्ये एका विशेष मोहिमेदरम्यान सीआरपीएफचा के-९ रोलो या शूर श्वानाचे निधन झाले आहे. रोलोचामोहिमेदरम्यान अचानक मधमाशांच्या थव्याने केलेल्या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला होता. सर्वतोपरी प्रयत्न करूनही त्याला वाचवता आलं नाही. रोलो हा बेल्जियन मॅलिनॉइस जातीचा कुत्रा होता. तो छत्तीसगड-तेलंगणा सीमेवर तैनात होता. तो स्फोटके शोधण्यात आणि गस्त घालण्यात तज्ज्ञ होता. सीआरपीएफ आणि छत्तीसगड पोलिस करेगुट्टा टेकड्यांमध्ये आतापर्यंतचे सर्वात मोठे नक्षलविरोधी ऑपरेशन राबवत होते. हे ऑपरेशन सुमारे तीन आठवडे चालले.

## उष्णतेपासून नागरिकांची सुटका, राज्याच्या विविध भागात पूर्वमोसमी पावसाची हजेरी

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील वातावरणात बदल झाला असून अनेक भागात पूर्व मोसमी पावसानं हजेरी लावल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या तीन ते चार दिवसापासून वातावरणात बदल होत आहे. काही भागात उन्हाचा चटका अद्यापही जाणवत आहे. मात्र, काही भागातपावसाचा जोर असल्याचं पाहायाल मिळत आहे. दरम्यान, या पावसामुळं उष्णतेपासून नागरिकांची सुटका झाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या अनेक भागात पावसानं जोरदार हजेरी लावली आहे. मागील चार दिवसांपासून जिल्ह्यातील विविध भागात पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. सकाळपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण अनुभवायला मिळत होते. तर पारनेर तालुक्यातील सुपा येथे दुपारच्या टप्प्यात पावसाची जोरदार बॅटिंग पाहायला मिळाली. अचानक आलेल्या पावसामुळे सकल भागात पाणी साचलं होते. या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाला असून उकाड्यापासून नागरिकांची सुटका झाली आहे.

यवतमाळ जिल्ह्यात कालपासून ढगाळ वातावरण आहे. आज दुपारी विजेच्या कडकडाटासह जोरदार वळवाचा पाऊस झाला. या पावसामुळे काही प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. त्यामुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागला. या पावसामुळे नागरिकांना काहीसा उकड्यापासून सुटका झाली. हिंगोली जिल्ह्यामध्ये आज सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. जिल्ह्यातील हिंगोली सेनगाव कळमनुरी या तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये या पावसाने हजेरी लावली असून माळशेलू माळहिवरा या भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. या भागामध्ये तब्बल एक तास अवकाळी पाऊस धो धो बरसत होता. या पावसामुळं उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. तर या पावसामुळे वातावरणात कमालीचा गारवा पसरला आहे. वाशिमच्या विविध भागात आज वळीवाच्या पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. पावसाने शेतकऱ्यांची शेतमाल विक्रीसाठी नेले असता पावसापासून वाचवण्यात दाणादाण उडाली. तर लग्नाची तिथी दाट असल्याने अनेक लग्न मंडपात चिखल झाल्याने पाहुणे मंडळींना गावातील ओट्या वरांडयाचा पावसापासून बचावासाठी आधार घ्यावा लागल्याचं चित्र पाहायला मिळालं आहे.


## पाहिजेत

सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ (धार्मिक अल्पसंख्यांक संस्था दर्जा प्राप्त) संचलित मिलिंद विद्यालय कुंडलवाडी (१००% अनुदाणित) ता. बिलोली जि.नांदेड या शाळेत खालील प्रमाणे पदे भरावयाची आहेत.तरी इच्छुक उमेदवारांनी त्यांच्या मुळकागदपत्रांसह व छायांकितप्रतीसह दिनांक १९/०५/२०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता मुलाखतीस उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाची संख्या | वर्ग | पदाचे नाव | राखीव प्रवर्ग | विषय | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ९ वी व १० वी | शिक्षण सेवक | अराखीव | गणित | B.Sc., B.Ed. |
| २ | १ | ९ वी व १० वी | शिक्षण सेवक | अराखीव | विज्ञान | B.Sc., B.Ed. |
| ३ | १ | ९ वी व १० वी | प्रयोग शाळा सहाय्यक | अराखीव | ---- | H.S.C.(12 th) (Science) |

**ही पदे अनारक्षित असुन कोणत्याही प्रर्वगाच्या उमेदवारास मुलाखत देता येईल.**

**अध्यक्ष**
सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ
कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड

**सचिव**
सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ
कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड

**मुख्याध्यापक**
मिलिंद विद्यालय
कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड

### Change In Name

My old Name is SULTANA BEGAM which now I am Changing as New Name CHAND SULTANA Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same, Sign by. CHAND SULTANA W/O ABDUL WAHAB BAGBAN Address: 9-7-608/30 Godavari Colony Tipu Sultan Road Maltekdi Road Itwara Nanded. Mob 9970562442

### Change In Name

My old Name is ABDUL WAHAB which now I am Changing as New Name ABDUL WAHAB ABDUL AZIZ BAGBAN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, Sign by. ABDUL WAHAB ABDUL AZIZ BAGBAN S/O ABDUL AZIZ Add: 9-7-608/30 Godavari Colony Tipu Sultan Road Maltekdi Road Itwara Nanded. Mob 9970562442




### Change In Name

I have Changed My Name From Old Name SUMAIYA SAMREEN SYED ASIFAHMED To New Name KHAN SUMAIYA SAMREEN
ADD-S.N.160/2 PLOT NO 4 MAMTA NAGAR NANDED 431604 MAHARASHTRA INDIA MO 8055344997

### Change In Name

I SYED ASIF AHMED Am Changing My Childs Mame From SYED UMRAIN AHMED To New Name UMRAIN SYED
ADD-S.N.160/2 PLOT NO 4 MAMTA NAGAR NANDED 431604 MAHARASHTRA INDIA MO 8055344997

### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की श्री काळेश्वर अर्बन महिला को-ऑपरेटिव्ह सोसायटी म. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड या सहकारी संस्थेचे संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० या कालावधी करिता संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम दिनांक १९/०५/२०२५ पासून सुरुवात करण्यात येत असून नाम निर्देशन पत्र विक्री व स्वीकृती दिनांक १९/०५/२०२५ ते २३/०५/ २०२५ या कालावधीत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था लोहा तालुका लोहा, यांचे कार्यालय मेन रोड, चव्हाण कॉम्प्लेक्स. व्यंकटेश गार्डन मंगल कार्यालयाच्या समोर या ठिकाणी सकाळी ११:०० ते दुपारी ३:००या वेळेत नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती करण्यात येणार आहे तसेच प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक २६/०५/२०२५ रोजी असून संचालक मंडळाच्या निवडीकरिता मतदानाची आवश्यकता पडल्यास मतदान दिनांक २२ / ०६ /२०२५ रोजी होणार आहे निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम सहायक निबंधक सहकारी संस्था लोहा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर व संस्थेच्या नोटीस बोर्डावर डकाविण्यात आलेला आहे करीता या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते

ठिकाण :- लोहा.
दिनांक:- १६/०५/२०२५

**जाहीर प्रगटन देणार**
**निर्माण पि बाळकृष्णा देशमुख**
**रा.सत्यम नगर, सिडको,**
**औरंगाबाद/छत्रपती संभाजीनगर नगर.**

### जाहीर प्रगटन

श्री एस. जी. ठाणेदार दिवाणी न्यायाधीश,२ रे दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, बिलोली यांचे न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०४ /२०२५

अर्जदार-१. उस्मान पि. अबुबकर चाऊस, वय - ५४ वर्ष, व्यवसाय - नौकरी, रा. छोटीगल्ली, बिलोली ता. बिलोली, जि. नांदेड. सध्या राहणार :- घर नं. ७-३-५४० मुनवर मस्जीद जवळ, साईनगर, नांदेड. ०२. सालेहा बेगम भ्र. शेख अहेमद, वय - ५० वर्ष, व्यवसाय - घरकाम,-सध्या रा. ४-१३/२, सत्यनारायणा पुरम वर्णी मंडल, निजामाबाद (तेलंगणा).

विरुध्द

गैरअर्जदार:-निरंक

प्रकरण - मुंबई रेग्युलेशन कायदा कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी, अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे की, मयत नामे आलीया बेगम अबुबकर चाऊस, रा. छोटीगल्ली, बिलोली ता. बिलोली, जि. नांदेड येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक १०/०७/२०२४ रोजी छोटीगल्ली, बिलोली ता. बिलोली, जि. नांदेड येथे मयत झाल्या आहेत.

मयत आलीया बेगम अबुबकर चाऊस, रा. छोटीगल्ली, बिलोली ता. बिलोली, जि. नांदेड यांचे वारस असल्याचे वारसा प्रमाणपत्र अर्जदारास मिळणेबाबत सदरील अर्ज अर्जदारांनी दाखल केला आहे. त्यानूसार सदरहू जाहिर प्रगटन देण्यात येत आहे की, ज्या कोणास या बाबत हरकती वा आक्षेप असल्यास त्यांनी आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायालयास दि. २७८०६ /२०२५ रोजी पर्यंत सादर कराव्यात. तारखेनंतर आलेल्या हरकती अथवा आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्जदाराचा अर्ज साबीत दिसल्यास वारसाचे प्रमाणपत्र दिले जाईल. करिता हे जाहिर प्रगटण.

आज दिनांक : १३ मे, २०२५ रोजी सही व शिक्यानिशी दिले.

**आदेशावरुन,**

**लिपीक** **सहा. अधिक्षक,**
**दुसरे दिवाणी न्यायालय. क. स्तर, बिलोली**

### जाहीर प्रगटन

भोकर येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. रवि शिवाजीराव इरले, २ रे सह सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर.दिवाणी किरकोळ अर्ज क. १२०/२०२५

अर्जदार-सुमन भ्र. रमेश कदम वय -६५ वर्षे. व्यवसाय- घरकाम, रा. टेळकी, ता. लोहा, जि. नांदेड

विरूध्द

गैरअर्जदार -शाखा व्यवस्थापक (शाखाप्रमुख), नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. नांदेड, शाखा भोकर, ता. भोकर, जि. नांदेड.

विषय-कलम ०३ मुंबई रेग्युलेशन VIII १८२७ कायद्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की. अर्जदार हा मयताची पत्नी आहे. मयत रमेश पि. संभाजीराव उर्फ संभाराव कदम या दि. ३१/०३/२००९ रोजी राहत्या घरी मौजे टेळकी, ता. लोहा, जि. नांदेड येथे मयत झाले. अर्जदार याच मयत नामे रमेश पि. संभाजीराव उर्फ संभाराव कदम यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारसाचे म्हणणे आहे.

मयत नामे रमेश पि. संभाजीराव उर्फ संभाराव कदम यांचे अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयताच्या मृत्यु पश्चात विविध शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे अन्यथा त्यानंतर कोणाचेही आक्षेप नाही असे समजून अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.आज दिनांक १३ मे २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर**

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचिन करण्यात येते की, स्थित मौजे पोमनाळा ता. भोकर जि. नांदेड येथील गट कृ. १६० मधील लक्ष्मण पि भोजू उर्फ भोजराम राठोड यांच्या नावे असलेली क्षेत्रफळ ० हे ९२ आर, आनंदा उर्फे आनंदराव लक्षण राठोड यांच्या नावे असलेले क्षेत्रफळ ० हे. ९३ आर, पुंडलीक पि भोजराम उर्फ भोजू राठोड यांच्या नावाने असली क्षेत्रफळ ० हे ९३ आर पैकी ० है ६५ आर जमिण माझे पक्षकार नितीन पि बाळकृष्णा देशमुख रा.सलम नगर, सिडको औरंगाबाद यांनी वरिल जमिण खरेदी करण्याचा सौदा केला असून सौदया पोटी काही रक्कम वरिष्ठ व्यक्तींना आहे व उर्वरित रक्कम वरिम व्यक्तीना देवून नोंदणीकृत खरेदेखित करून घेणार आहेत.

ती वरिष्ठ जमिनीबाबत कोणाला काही आक्षेप, उनर व नकार असल्यास ८(आठ) दिवसात मूळ कागदपत्रासह आरोप घ्यावा त्यानंतर आलेल्या नकारीत माझे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत.करीना सबब हे जाहिर प्रगटन दर आहे.

**मार्फत**
**ॲड. शिवाजी.व्ही.कदम नागापुरकर**
**जिल्हा व सत्र न्यायालय**
**भोकर. मो. न. ८८०६७५९७२२**

**जाहीर प्रगटन देणार**
**निर्माण पि.बाळकृष्ण देशमुख**
**रा.सत्यम नगर सिडको**
**औरंगाबाद/ छत्रपती संभाजीनगर**

स्थलांतर

सिटी मॅक्स डिजिटल कलर

मो.7058766021,9422185282

गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# रस्त्यावर दारू पिणाऱ्यांवर आणि जागा उपलब्ध करून देणाऱ्यांवर कारवाई

## रस्ते सुरक्षा पथकाचा दणका

**नांदेड (प्रतिनिधी)–** सार्वजनिक ठिकाणी मद्य प्राशन करून धिंगाणा घालणारे मद्यपी व त्यांना अभय देणाऱ्यांवर थेट कारवाई करीत रस्ते सुरक्षा पथकाने चांगलाच दणका दिला आहे. या पथकाने शहरात वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करून रस्त्यावर दारू पिणाऱ्यांना अटक केली.

रस्ते सुरक्षा पथक प्रमुख सपोनि भागवत नागरगोजे व चार्ली पोलीस अंमलदार यांनी १५ मे रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे व दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देणारे इसमांवर करण्यात आलेली कारवाई केली. ती पुढील प्रमाणे आहे. पोलीस स्टेशन भाग्यनगर हद्दीत पथकातील पोलीस अंमलदारांनी पेट्रोलिंग दरम्यान जिराईत मैदान, भगीरथ नगर येथे सार्वजनिक ठिकाणी दोन मद्यपींना ताब्यात घेवून त्यांच्यावर पोलीस स्टेशन भाग्यनगर ठाण्यात म.पो. का. कलम ११०/११७ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच एकतानगर येथे एकास



दारू पिण्यासाठी ग्लास, पाणी पाऊचची विक्री करणाऱ्यांवर भाग्यनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस अंमलदार यांनी पेट्रोलिंग दरम्यान ढवळे कॉर्नर येथे इसमास ताब्यात घेवून त्याचेवर पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे म.पो. का. कलम ११०/११७ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच ढवळे कॉर्नर येथे ५ इसमांना दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्यांवर नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६८.८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच शहरातील साठे चौकात एकास दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# किनवटला भुयारी पुलाचे काम अपूर्ण; पावसाळ्यात नागरिकांचे हाल अटळ

**किनवट (प्रतिनिधी)–** शहराच्या एसव्हीएम रस्त्यावरील रेल्वे भुयारी पुलाचे काम गेल्या ४ महिन्यांपासून सुरू आहे. एकूणच कामाची गती पाहता पुलाचे काम येत्या २ महिन्यांत पूर्ण न झाल्यास भरपावसात नागरिकांचे मोठे हाल होणार आहेत.



एसव्हीएम रस्त्यावरील रेल्वेगेटवर रेल्वेगाड्यांच्या आवागमनामुळे वाहतुकीची कोंडी होत होती. या रस्त्यावरून परिसरातील ६ गावच्या ग्रामस्थांसह स्थानिक नागरिक व शेकडो विद्यार्थी ये–जा करतात. दिवसभरातून १० ते १५ वेळा गेट बंद करण्यात येत असल्याने वाहतूक खोळंबत होती. रेल्वे प्रशासनाने नागरिकांची होणारी गैरसोय लक्षांत घेवून ४ महिन्यांपूर्वी रेल्वेगेट काम पूर्ण होईपर्यंत बंद केले.हे करीत असताना नागरिकांना पक्का पर्यायी रस्ता दिला नाही. यामुळे एसव्हीएम कॉलनी परिसरासह ६ गावच्या लोकांना सुभाषनगरच्या भुयारी पुलाखालून वळसा घालत किनवट शहरात ये –जा करावे लागत आहे. दुसरा एक पर्यायी रस्ता पैनगंगा नाल्यातून काढण्यात आला आहे.हा पर्यायी रस्ता जोखीमीचा आणि धोकादायक आहे. रस्त्यावरील माती व मुरुमामुळे सध्या अधूनमधून पडणाऱ्या मान्सूनपूर्व पावसात या रस्त्यावरुन वाहने चालविणे अवघड झाले आहे.

पावसाळा तोंडावर असताना भुयारी मार्गाचे संथगतीने होणारे काम पाहता पैनगंगानदीला पूर आल्यास हा रस्ता बंद होवून नागरिकांचे हाल होणार आहेत. पावसाळ्यात स्थानिक व परिसरातील ग्रामस्थांसह एसव्हीएम शाळेच्या शेकडो विद्यार्थ्यांना सुभाषनगर भुयारी मार्ग हाच एकमेव पर्याय असणार आहे.

**सुभाषनगरच्या भुयारी पुलात घाणीचे साम्राज्य**

एसव्हीएम भुयारी पुलाच्या कामामुळे सुभाषनगरचा भुयारी पूल हा पर्याय म्हणून वापरला जात आहे. या अरुंद पुलाखाली परिसरातील नालीचे पाणी येते. पाण्याचा निचरा होण्याची सोय केली नसल्याने पावसाळ्यात नागरिकांना घाणीचा सामना करीत पुलाखालून ये – जा करावे लागणार आहे.

# मुकुंद जवळगावकर यांची नांदेड उत्तर विधानसभा प्रमुखपदी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेनेचे माजी नगरसेवक मुकुंद जवळगावकर यांची शिवसेनेचे नांदेड उत्तर विधानसभा प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे. ना. हेमंत पाटील आणि आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली आहे.



नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेचे माजी नगरसेवक, मजूर फेडरेशनचे संचालक मुकुंद जवळगावकर यांची नांदेडच्या राजकरणात संयमी आणि लोकहितवादी नेतृत्व म्हणून ओळख आहे. शिवसेनेशी कायम एकनिष्ठ राहिलेल्या जवळगावकर यांनी नांदेड महापालिकेत शिवसेनेचा नगरसेवक म्हणून अत्यंत प्रभावी कामगिरी केली आहे. सत्ताधाऱ्यांना जब विचारून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी नेहमीच आवाज उठविला आहे. शिवसेना पक्ष प्रमुख तथा उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात, युवासेना प्रमुख खा. श्रीकांत शिंदे, शिवसेना सचिव संजय मोरे , शिवसेना नेते ना. हेमंत पाटील, शिवसेना नेते आनंदराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली आणि जननायक आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जवळगावकर शिवसेनेत अत्यंत निष्ठेने काम करीत आहेत.

# उद्या जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन १९ मे रोजी सकाळी ११ वाजता महसुल प्रबोधनी (प्रशिक्षण केंद्र) एसबीआय एटीएमच्या मागे जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे आयोजित केला आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात येतो. संबंधित समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमुद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित राहणार आहेत.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात ३१ मे २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात दि. १७ मे रोजी सकाळी ६ वाजेपासून ते ३१ मे २०२५ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

पान १ वरून...

**राज्यातील आयजी/डीआयजी...**

पुणे, जी. श्रीधर – पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस दळण–वळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, मोक्षदा पाटील – पोलीस उप महानिरीक्षक, रा. रा. पोलीस बल, राकेश कलासागर – पोलीस आयुक्त, लोहमार्ग, बृहन्मुंबई, प्रियंका नारनवरे – अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई, अरविंद साळवे – सहसंचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक, सुरेश कुमार मेंगडे – मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, नवी मुंबई, धनंजय कुलकर्णी – अपर पोलीस आयुक्त, विशेष शाखा, बृहन्मुंबई, विजय मगर – रा र पोलीस उप महानिरीक्षक, राजेश बनसोडे – अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर, विक्रम देशमाने – अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, बृहन्मुंबई, राजेंद्र दाभाडे – अपर पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचा समावेश आहे.

# कत्तलखान्यातून मांस जप्त

**नायगांव बाजार (प्रतिनिधी)–** येथील खाटीक गल्लीतील कत्तलखान्यावर धाड टाकून पोलिसांनी जवळपास १३ हजारांचे गोवंश मांस जप्त केले आहे. यामध्ये चार आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांच्या नेतृत्वाखाली दि.१६ रोजी ही कारवाई करण्यात आली आहे.

परिविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक किरण पोपळघट यांना खाटीक गल्लीतील कत्तलखान्यात गोवंश मांस असल्याची माहिती मिळाली. त्यावरून नायगांव पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गजानन तोटेवाड, पो.हे.कॉ. साई सांगवीकर यांनी तिथे धाड टाकून विक्रीसाठी तयार असलेले गोवंशाचे ६२ किलो मांस जप्त करण्यात आले.

या प्रकरणी नायगांव पोलिसांनी खलील कुरेशी रा. पिंपळगाव, मगदूम कुरेशी रा. नायगाव, तौफिक कुरेशी रा. नायगाव, अजीम कुरेशी रा. नायगांव यांच्या विरोधात नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांनी दिली आहे.

# सिडको परिसरातील वृत्तपत्र विक्रेत्यांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुरव लोणे व मोनीका ठाकूर या दोन गुणवंत पाल्यांचा नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष रमेश ठाकूर व ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला.

सिडको वृत्तपत्र विक्रेते संघटनेच्या वतीने शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत पाल्याच्या सत्कार १५ में रोजी सिडको वृत्तपत्र विक्रेता टिनशेड येथे करण्यात आला. यावेळी वृत्तपत्र विक्रेता दिलीप ठाकूर यांच्यी मुलगी मोनीका ठाकूर,




महिला वृत्तपत्र विक्रेता वंदना लोणे यांच्या मुलगा धुव्र लोणे यांनी दहावी परिक्षेत यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार करून पुढील शिक्षणासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेत्या वंदना लोणे, मदनसिंह चव्हाण, दौलतराव कदम, शेख सयोध्दीन यांच्या सह वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे अध्यक्ष सतिश कदम, बालाजी सुताडे, दिलीप ठाकूर, राम धांवडे, गणेश डोळस, शुभम कुंभार, राजु चव्हाण, गजानन धावडे, साई गोटमवार, महेश सुताडे, अमोल नांदेडकर यांच्यासह वृत्तपत्र विक्रेते व सुनिल शिंदे यांची उपस्थिती होती.

# वजिराबाद ठाण्यातील जप्त दुचाकी गाड्या मूळ मालकांनी घेऊन जाव्यात –पोनि कदम

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्यात अनेक दिवसांपासून बेवारस असलेल्या १६८ दुचाकी वाहनांची ओळख पटविण्यासाठी पोलीसांनी आवाहन केले आहे. मूळ मालकांनी कागदपत्र दाखवून आपल्या गाड्या घेऊन जाव्यात असे, आवाहन पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी केले आहे.

नांदेड शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या प्रांगणात १६८ दुचाकी वाहने उभी आहेत. या वाहनांच्या मालकांचा शोध लागला नाही. या सर्व वाहनांची यादी नांदेड जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळ www.nandedpolice.gov.in, नांदेड जिल्हा पोलीस फेसबुक पेज Nanded Police, इंस्टाग्राम sp_nanded_police आणि ट्विटरवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या बेवारस वाहनांच्या संदर्भाने नागरीकांनी पुढच्या दोन दिवसांत आपल्या वाहनाच्या मालकी हक्काची ओळख पटवून ती वाहने घेवून जावीत, अन्यथा ती वाहने लिहावाद्वारे विक्री केली जातील, असे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी कळविले आहे.

# कॉलेज प्रशासनाच्या मानसिक छळामुळेच पुनीतचा मृत्यू; राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) चा आरोप



**नांदेड (प्रतिनिधी)–** एसजीजीएस लोटस नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या अन्यायकारक, बेजबाबदार कारभारामुळे पुनीत वाटकर या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात येत आहे. कॉलेजमधील अरेरावी, बनावट प्रिन्सिपल, बाहेरून आणलेले फेक शिक्षक, विद्यार्थिनीसोबत गैरवर्तन आणि सततचा दबाव यामुळे पुनीत सारख्या विद्यार्थ्याचे आयुष्य संपवले गेले, असा आरोपही राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार)गटाच्या वतीने करण्यात आला आहे.

प्रारंभी या प्रकरणी पुनीतची आई आणि बहीणीला पोलीस स्टेशनमध्ये मदत मिळाली नाही. पण राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेस शरदचंद्र पवारचे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी लक्ष घातल्याने पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली.

याप्रकरणी दोषींवर तात्काळ कठोर कारवाई झाली नाही, तर राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेसकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा फैसल सिद्दिकी यांनी दिला आहे. पुनीत वाटकरला न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील, असेही सांगितले आहे. त्यावेळी निवेदन देताना पुनीतची आई संगीता वाटकर, बहीण श्वेता वाटकर, उत्तर विधानसभा अध्यक्ष अमितसिंघ सुखमणी, प्रज्वल कडुकर, संदेश वेरेकर, शुभम, दत्ता आढाव इत्यादी उपस्थित होते.

# विद्यापीठ–उद्योग भागीदारीतून विकासाला चालना –कुलगुरू डॉ. चासकर

## ‘स्वारातीम’ विद्यापीठातील उद्योजक परिसंवाद–२०२५ कार्यक्रमाला प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यापीठाकडे ऊर्जावान मनुष्यबळ आहे. उद्योजकांच्या गरजा समजून घेऊन अभ्यासक्रमात योग्य ते बदल करत विद्यार्थ्यांना रोजगाराक्षम कौशल्य देण्याची आज आवश्यकता आहे. विद्यापीठ उद्योगांशी सहकार्य नव्हे, तर भागीदारी करू इच्छिते. विद्यापीठ–उद्योग भागीदारीतून मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळणार आहे, असा विश्वास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित विद्यापीठ उद्योजक परिसंवाद–२०२५ कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करतांना ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नांदेड इंडस्ट्री असोसिएशनचे हर्षद शहा, गणेश महाजन, प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन, प्रभारी कुलसचिव डॉ. एम.के. पाटील, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, नरेंद्र चव्हाण, डॉ. डी. एम. मोरे, डॉ. संतराम मुंडे, डॉ. संगीता माकोणे, डॉ. शैलेश वाढेर आदींची यावेळी उपस्थिती होती.

नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली जिल्ह्यातील उद्योजकांनी या परिसंवादात सहभाग नोंदवला. ओमप्रकाश डागा, राजेश धूत, चंद्रकांत गव्हाने, अमोल श्रीफुले, अरुण फाजगे, सुनील दुबेवार तर प्राचार्य तर्फे डॉ. बी.यु. जाधव व डॉ. के.एस. कनसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उद्योजकांनी विद्यापीठाच्या भूमिकेचे कौतुक करत पुढील सहकार्याची ग्वाही दिली. विद्यापीठाचे काम केवळ शिक्षण देण्यापुरते मर्यादित नसून समाजाला दिशा देण्याचेही आहे. विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. या उपक्रमात विद्यापीठाला आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू, असे मत नांदेड इंडस्ट्री असोसिएशनचे हर्षद शहा यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविक करण्यासाठी राज्यशासनाने EDP च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गठीत केलेल्या समितीचे सदस्य व विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी ‘अप्रेन्टिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम’ ह्या रोजगाराभिमुख शिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमाविषयी व महाराष्ट शासनातर्फे महाराष्ट्रातील विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या या कार्यप्रणाली बाबत पीपीटीद्वारे सविस्तर सादरीकरण केले.

कार्यक्रमात व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण म्हणाले, मराठवाड्यात उद्योग स्थापनेची संधी मोठी आहे. परंतु येथे मनुष्यबळ असले तरी त्यांच्याकडे आवश्यक कौशल्याचा अभाव आहे. हे चित्र बदलण्यासाठी अप्रेन्टिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम सारख्या उपक्रमांची भूमिका निर्णायक ठरेल. यावेळी डॉ. प्रशांत पेशकार व गणेश महाजन यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. यावेळी अधिष्ठाता, विविध संकुलाचे संचालक, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षण, नियुक्ती व अंतरवासिता कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी मुधोळकर यांनी केले तर आभारप्रदर्शन नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य विभागाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांनी केले. आयक्यूएसी विभागाचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. चैतन्य, डॉ. राजकुमार मून यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com